नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र
सप्टेंबर १९

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

या अंकांत—

भृगु	(ना. गो. चापेकर)	२०९
‘ नव काव्यांतील विफलता ’ व वेडेकरांचा साम्यवादी प्रचार	(पां. ब. गाडगीळ)	२१५
आसमंत फुललें, फुललें	(उ. रा. गिरी)	२२०
विचारतरंग	(चिकित्सक)	२२१
ग्रंथ समीक्षा	(सुरेश म. डोळके; बाळ पांडे; भ. श्री. पंडित; चोरघडे)	२२३
ये जेव्हां येणार	(वा. गो. मायदेव)	२२९
बालकवींची कविता	(माधव गोपाळ जामदार)	२२९
नव्या संवेदनेचा कवि	(वि. गो. रुक्मांगद)	२३०
अभ्र आलें अभ्र गेलें—	(राजकवि काळेले)	२३२

शिवाय संघवार्ता, परीक्षांचे निकाल, निवेदन इ. इ.

वर्ष	अंक	किंमत
सातवें	सहावा	आठ आणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादक मंडळ
प्रा. भ. श्री. पंडित
डॉ. मा. गो. देशमुख
प्रा. अ. ना. देशपांडे
श्री. मधुकर मंगरूळकर

संपादक :
वामन चोरघडे

★

पत्रव्यवहाराचा पत्ता :
" युगवाणी " कार्यालय
विदर्भ साहित्य संघ
उत्तर अंबाझरी रोड
धंतोली, नागपूर १०

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भृगु

ना. गो. चापेकर

★

भृगु शब्द भ्रस्ज् धातूपासून व्युत्पादितात. तसेंच ह्या धातूचा अर्थ भाजणें असा आहे हें सांगावयास नको. भाजणें हा अग्नीचा धर्म आहे. तेव्हा अग्नीशी भृगूंचा निकट संबंध असल्यास नवल नाही. 'अर्चिषु भृगुः संबभूव'=भृगु ज्वालेंत जन्मला [१]; ज्वालेंत जन्मला म्हणजे ज्वालेसहवर्तमान जन्मला. "सह ज्वालाभिरुत्पन्नो भृगुस्तस्मात् भृगुःस्मृतः" [२] भृगू कोण होते हें ठरविण्यास व्युत्पत्तीचा आधार फार उपयोगी पडतो. नांवांत इतिहास आहे. ह्यावरून भृगु अग्निपुरुष होता असें म्हणावयास हरकत नाही. तसेंच ह्याच कारणानें भृगूचें दिव्य स्वरूप अनुमानणें गैर होणार नाही.

भृगूंनीं अग्नीला जन्म दिला असें कवि एका मन्त्रांत म्हणतो [३]. एकट्या भृगूंनी नाही तर "द्यावा, पृथिवी, आप, त्वष्टा आणि भृगू" ह्या सर्वांवर अग्नीचें जनकत्व कवि लादतो [३]. "भृगवः" असें अनेकवचनी रूपक वीने योजिलें आहे हें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. ज्वालांनी युक्त असा तूं जन्मास येतोस (द्युभिः त्वमग्नेजायसे) असें अग्नीचें वर्णन केलें आहे [४]. हें वर्णन भृगूंच्या वर्णनाशी जुळणारें आहे. ह्यावरून विद्युत् म्हणजेच भृगु असा तर्क करावासा वाटतो. वरील मंत्रांतील, "द्यु, आप व त्वष्टा" ह्या सर्व अंतरिक्षांतील देवता आहेत. ह्यास्तव भृगु देवतासुद्धा तत्रस्थच आहे हें म्हणणें ओघानेच प्राप्त होतें. त्वष्टा व भृगु ह्यांच्या जोडीकडेहि आपलें लक्ष वेधणें अवश्य आहे. त्वष्टा हा देवांचा सुतार. तसेंच भृगवः शब्द त्याच अर्थानें वापरलेला आहे हें पुढे निदर्शनास आणलें जाईल. सध्या भृगु व त्वष्टा हे दोन शब्द एकत्र आलेले आहेत इतकेंच ध्यानांत ठेवावें. उपर्युक्त ऋचेंत "द्यावा पृथिवी" हे शब्द आहेत. अर्थात् पृथिवी शब्द आपणांस नडण्यासारखा आहे. पृथिवी म्हणजे भूमि असा अर्थ घेतल्यास पृथिवी अंतरिक्षांतील नसल्यानें अडचण उत्पन्न होते. तिचा परिहार पृथिवी म्हणजे विस्तीर्ण असा अर्थ मानून तें द्यावाचें विशेषण समजावें. पृथु शब्दापासून पृथिवी शब्द झाला आहे. ह्यामध्ये असा आक्षेप घेतां येईल की, "द्यावा" ही द्यु शब्दाची तृतीया विभक्ति आहे; निदान "द्यावा" शब्द प्रथमान्त नाही. ऋग्वेदांत द्यावापृथिवी हे जोडशब्द अनेक वेळां वापरलेले आहेत. अर्वाचीन संस्कृतमध्यें "द्यावा" शब्द नाही. द्वंद्वसमासांत "द्यु" चें "द्यावा" असें रूप होतें; आणि ह्याचें नेहमींचें उदाहरण म्हणजे "द्यावापृथिवी द्यौच पृथिवीच द्यावापृथिवी" असा विग्रह करतात. दिव् (आकाश) ह्याचें रूप समासांत द्यावा होतें असेंहि म्हणतात. ह्या सर्व आनिश्चिततेवरून "द्यावा" हेंच मूळचें प्रथमेचें एकवचनी रूप असावें असें वाटूं लागतें. हें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रूप ऋग्वेदांत आढळतें. उदा० " द्यावानः पृथिवी; द्यावायमग्निं पृथिवीजानिष्टाम्." ह्या उदाहरणांत द्यावा व पृथिवी ह्यांच्यामध्यें दुसरे शब्द आहेत हीहि गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे; एके ठिकाणीं " द्यावा " शब्दाचें प्रथमेचें द्विवचन (द्यावौ [५]) ह्या रूपांत योजलेलें आढळतें [६]. उषा व रात्र असें युग्म द्यावा शब्दानें समजावयाचें असें भाष्यकार म्हणतात. हा अर्थ बरोबर असेल तर द्यावा हें प्रथमेचें एकवचनी रूप मानण्याला बाधक आहे ह्यांत संशय नाही. तथापि हेंहि विसरतां कामा नये की द्यावा पृथिवी ह्यांत " द्यावा " हें द्विवचनी रूप नाहीं. विभक्ति कोणती हा प्रश्न बाजूस ठेवला तरी वचनाविषयीं संशय नाही. ऋग्वेदांत कोणतीहि विभक्ति दुसऱ्या कोणत्याहि विभक्तीकरतां योजितात ही गोष्ट ह्या संदर्भात लक्षांत ठेवणें अवश्य आहे. " यथार्थ विभक्तीःसंनमयेत् " हा नियम. तात्पर्य, येथे तृतीयेच्या ऐवजी प्रथमेचें रूप समजावें. ह्यामुळे सर्व देवता आकाशस्थ समजतां येतील. पृथिवींत अग्नि आहे अशी समजूतहि नाही; समुद्रांत व वनस्पतींत अग्नि आहे; पृथ्वींत नाही; पृथ्वीवर आहे. म्हणून पृथ्वीनें अग्नीला जन्म दिला असें सांगणें निरर्थक होईल.

आतांपर्यंत ज्या गोष्टी सिद्ध झाल्या त्या अशाः—भृगु अंतरिक्षांतील देवता. ज्वाला घेऊन ती जन्मास आली. तिनें अग्नीला जन्म दिला. भृगूंचें हें देवपण एका ऋचेंत स्पष्टपणें उल्लेखलें आहे. कवि अश्विना आळवतो, " हे अश्वीहो, तुम्ही तेहतीस देवांसहवर्तमान आप, मरुत, भृगू, उषा आणि सूर्य ह्यांच्या समवेत सोम प्या [७] ". वैदिक ऋषींनी एकाच देवतेला अनेक नांवांनी संबोधिलें आहे. हीं नांवें त्यांनी देवतेच्या निरनिराळ्या गुणांवर आधारलीं होतीं.

भृगूंनी अग्नीला पृथ्वीतलावर (पृथिव्याः नाभौ) सृष्टीच्या सामर्थ्यानें फेकून दिलें (आईरिरे)[८]. हें वर्णन आकाशांतून वीज जमिनीवर पडली असें सुचवितें. वेदीवर भृगूंनी अग्नीची स्थापना केली असें सायनभाष्य आहे. ह्यामध्यें आईरिरे ह्या क्रियापदाचा खरा अर्थ उतरत नाही. शिवाय, " भुवनस्यमज्जना=भुवनाच्या-निसर्गाच्या-शक्तीनें " हे शब्द अनर्थक राहतात. तसेंच हा भूमीवर पडलेला अग्नि तुम्ही मिळवा व त्याची स्तुति करून त्याला वेदींत ठेवा (तंगीर्भिः स्वदभे आहिनुहि= प्राप्नुहि), हें निराळें सांगण्याचें कारण काय ?

ह्याच अर्थाच्या दुसऱ्या एका ऋचेचा[९] विचार करूं. मंत्रकार म्हणतो गुहेंत असलेल्या अग्नीला मरुतांनी जेव्हां भृगूंकरतां प्रज्वलित केलें तेव्हां त्या अग्नीनें आपल्या तेजानें (समिधा) स्वर्ग व्यापला (उत् अस्तम्भीत्). सर्व तेजस्वी (तान्यांत) तो उत्तम तेजस्वी झाला. गुहेंत असलेला म्हणजे अदृष्ट असलेला किंवा ढगांत लपून राहिलेला असें समजल्याशिवाय गत्यंतर नाही. मेघांतील अग्नि म्हणजे वीज होय. वारा तिला बाहेर काढतो ही कविकल्पना. स्तम्भ् ह्या धातूचा अर्थ व्यापणें असा कोशांत आढळतो. महाभारतांत[१०] व्यापणें ह्या अर्थी स्तंभ् धातु वापरलेला आहे. मी हाच अर्थ येथे पसंत केला आहे. अग्नीनें म्हणजे विजेनें आकाश किंवा स्वर्ग स्थिर केले, उचलून धरले ह्या सायनभाष्यानें कांहीच बोध होण्यासारखा नाही. भृगुभ्यः ह्याचा अर्थ सूर्याच्या किरणांकरतां (आदित्यस्य रश्मिभ्यः) असा सायन करितात. अर्थात् भृगु म्हणजे सूर्याचे किरण असें सायन मानतात. भृगु शब्दाच्या अर्थाचा विचार पुढे होईल. येथे भृगूंचा संबंध आकाशांतील घटनांशी आहे पृथ्वीशी नाही; हा विचार प्रामुख्यानें मांडला आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भृगूंचें लक्षण व स्थान निश्चित झाल्यावर त्यांना अनुसरून ऋचांचा अर्थ करणें क्रमप्राप्त आहे. ह्यास्तव सायन भाष्य सोडून स्वतंत्र अर्थ कित्येक वेळां करावा लागतो. उ- भृगू हे ऋषी होते व ते यज्ञ करीत आहेत असें गृहीत धरून सायनाचार्य अर्थ करीत असतात. जेथे उपाय नाही तेथेच ते दुसरीकडे फिरकतात. भृगु ही आकाशस्थ निसर्ग-देवता आहे; तिचा विद्युत्, मरुत्, आप ह्यांशी संबंध आहे; भृगू हे देवांचे सुतार आहेत; "भृगवः रथनः" (भृगू रथ करतात त्याप्रमाणे) असें भृगूंच्या संबंधाने वर्णन केलेलें आहे. सुताराचें काम कापण्याचें असतें तेव्हा त्या अर्थाची विशेषणें भृगूंना लावलीं जाणें स्वाभाविक आहे. ह्या अनुसंधानाने मी पुढील ऋचेचा अर्थ करितों. ऋचेचा अन्वय असाः—विधन्तः भृगवः इमं (अग्निं) अपांसधस्थे आयोः विक्षुद्विता दधुः एषजीराश्वः देवानां अरातिः अग्निः भूम विश्वानि अभ्यस्तु." ह्यांतील अपां सधस्थे ह्याचा अर्थ अन्तरिक्षेः सधस्थे=सहस्थाने असा सायनांनीच केला आहे. त्यालाच धरून 'आयोःविक्षु' ह्याचा अर्थ करणें योग्य होईल. म्हणून आयु राजाच्या प्रजेमध्यें हा सायनांनी लावलेला अर्थ न स्वीकारतां वायूच्या प्रदेशांत असा अर्थ मी करितों. आयु म्हणजे वायु असें राजवाडे म्हणतात. विश म्हणजे राहण्याची जागा. जेथे वायु संचारतो तें स्थल म्हणजे अन्तरिक्ष. अपांसधस्ते व आयोःविक्षु एकच. त्याचप्रमाणे विधन्तः म्हणजे परिचरन्तः (पूजा–सेवा करणारे) असें भाष्यकार म्हणतात. परंतु विध् ह्या धातूचा अर्थ कापणें असा होतो. विधन्तः म्हणजे कापणारे. मेघ फोडून त्यांतून विद्युत् बाहेर फेकली जाते ही कल्पना कवीने केलेली दिसते. मंत्राचा आशय असा—कर्तनकर्म करणाऱ्या भृगूंनी अंतरिक्षांत अग्नीची दोन ठिकाणीं स्थापना केली. सर्व देवांत श्रेष्ठ असलेला हा अग्नि जगभर पसरो (विश्वानिअभ्यस्तु). विद्युत हेंच अग्नीचें मूळ नैसर्गिक स्वरूप.

अपां सधस्थे विधन्तः गुहासन्तं हेंच भृगूंचें व अग्नीचें वर्णन दुसऱ्या एका ऋचेंत आलें आहे. [१४] गुहासन्तं ह्याच्या ऐवजी गुहाचतन्तं (चततिर्गतिकर्मा) शब्द आहे एवढेच. परंतु अर्थांत फरक नाही. ह्या ऋचेचें तात्पर्य असें:—चुकलेल्या पशूंच्या पावलांवरून जसा माग काढतात त्याप्रमाणे लपलेला अग्नि बाहेर काढण्याची इच्छा धरून बसलेल्या धीट भृगूंच्या हातीं लागला.

जेथे जेथे अग्निरूप दिसेल तेथे तेथे त्याचें कारकत्व भृगूंकडे असणें स्वाभाविक आहे. मनुष्यांमध्यें व वनस्पतींमध्यें भृगूंनी अग्नि ठेवला असें वैदिक कवि आपणांस सांगत आहेत. एका मंत्रांत [१५] ऋषि म्हणतो, हे अग्ने तुला मनुष्यांत भृगूंनी मित्राप्रमाणे तसेंच मोहक द्रव्याप्रमाणे ठेवला आहे. तूं कसा ? तर लोकांनी आमंत्रण करण्यास योग्य असा, होता, अतिथि, श्रेष्ठ असा. दिव्य जन्मने ही चतुर्थी आहे. तिचा अर्थ लोकांना दिव्य जन्म प्राप्त व्हावा म्हणून असा केला जातो. माझ्या मते द्वितीयार्थी चतुर्थी घ्यावी व अग्नीशी ते शब्द संबद्ध करावे. दिव्य जन्म आहे ज्याचा असा अग्नि त्या तुला इ. एका ऋचेंत [१६] वीतहव्य म्हणतो, भृगूंनी मित्राप्रमाणे अग्नीला वनस्पतींत स्थापिलें. एका मंत्रकाराने भृगूंना सूर्य व कण्व ह्यांच्या जोडीला बसविलें आहे. [१७] तो म्हणतो भृगूंनी कण्व व सूर्य ह्यांच्याप्रमाणे सर्व विश्व व्यापून टाकलें. कण्व शब्दाने काळोख समजावयाचा. सारांश, प्रस्तुत ऋचेवरूनहि भृगूंचें स्थान अंतरिक्ष हें अनुमान दृढ होतें.

येथवर विवेचन केलेल्या ऋचा भृगूंचें स्वरूप निश्चित करण्याला उपयोगी पडणाऱ्या आहेत. ह्या ऋचा करणाऱ्या ऋषींना स्वतःची माहिती होती. आकाशांतील

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ऐका दृश्याचें ते काव्यरूपाने स्वतः वर्णन करीत आहेत. अर्थात् ह्या प्राचीन ऋचा असाव्यात.

भृगू हे रथ करणारे असा अर्थ दोन ऋचांवरून निष्पन्न होतो.[१८] ऋषी म्हणतो इन्द्राकरतां भृगूंनी रथ केला त्याप्रमाणे आम्ही हें स्तोत्र केलें आहे की ज्यामुळे आमचें सख्य कायम टिकेल आणि तो प्रतापी इन्द्र आमचें संरक्षण करील. दुसरा ऋषि अश्विनींना विनवितो की भृगूंनी रथ केला त्याप्रमाणे हें स्तोत्र मी बनावलें आहे (तासून तयार केलें आहे) व तें मनुष्यांत मुलाला जपतात तसें जपून ठेवून स्त्रीला सजवतात तसें सजविलें आहे. ह्यांमध्यें भृगू सूर्याचा रथ बनावितात अशी कल्पना केलेली दिसते. भृगू म्हणजे सूर्य किरण असा सायनांनी अर्थ केलाच आहे.

कालांतराने भृगूंच्या भोवतीं अद्‌भुत दंतकथांचें जाळें पसरलें असावें. पुढल्या पिढीला भृगु हा एक पुराणपुरुष ह्या नात्याने माहीत झाला. आतापर्यंत निर्दिष्ट केलेल्या ऋचांत भृगु शब्द अनेकवचनीं उपयोजलेला आहे. परंतु पुढच्या मंत्रांत एकवचनी शब्द येऊं लागला. उदा. " हे अग्ने आम्ही तुला भृगूप्रमाणे, मनुप्रमाणे अंगिराप्रमाणे बोलावतों. " " समुद्रामध्यें राहणाऱ्या अग्नीला और्वभृगूप्रमाणे अप्नवानाप्रमाणे मी बोलावतों. " ह्या मंत्रांत भृगूच्या ऐवजी और्वभृगु हा शब्द आहे. हा और्वभृगु म्हणजे मूळचा भृगु नव्हे हें स्पष्ट आहे. भृगु ही कोणी व्यक्ति नव्हती हें आपण पाहिलेंच आहे. तेव्हा भृगु हें नांव ज्यांनी धारण केलें त्यांच्या कुलांत जन्मलेला और्वनांवाचा कोणीतरी ऋषि असावा. ह्याचा उल्लेख ऋग्वेदांत अन्यत्र नाही. अप्नवान हाहि भृगुकुलांतील असण्याचा संभव आहे. कारण भृगूंबरोबर त्याचें नांव येतें.

पुढील मंत्रांत अप्नवानः भृगवः अशीं दोन नांवें आहेत. त्यांचा स्पष्ट बोध होत नाही. ह्या मंत्राचा सारांश असा की, वनांत चित्रविचित्र रूप धारण करणाऱ्या व सर्वत्र पसरणाऱ्या (विभ्वं) ज्या अग्नीला अप्नवा (व) भृगू यांनी ठिकाठिकाणी (विशेविशे) प्रदीप्त केलें, त्या ह्या होता, यजनप्रचुर (याजिष्ठः) यज्ञांत पूजल्या जाणाऱ्या अग्नीला अध्वर्यूंनी येथे स्थापिला.[२१] येथे भृगवः ह्या शद्वाने कोण समजावयाचें ? भृगु नांव धारण करणारे ते भृगवः असें म्हणतां येईल. परंतु मग अप्नवा हा भृगूंपैकी नव्हता असें म्हणण्याचा प्रसंग गेईल. ही आपत्ति टाळण्याकरता सायनाचार्य अप्नवान व दुसरे भृगू असा अर्थ करितात. असें करितांना च शब्द अध्याहृत घ्यावा लागतो. विरुरुचुः हें क्रियापद बहुवचनीं आहे तेव्हा कर्तेहि बहु असले पाहिजेत! ह्यास्तव भृगवः हें पद कायम ठेवणें भाग आहे. म्हणून सायनांनी केलेला अर्थ मान्य होण्याजोगा आहे.

ह्याच वर्गांतील दुसरा एक ऋषि इंद्राला आळवतो, हे इन्द्रा, ज्या यतींनी, ज्या-भृगूंनी तुला संतुष्ट केलें (त्यांच्यामध्यें) माझेंच बोलावणें ऐक. येथे भृगवः म्हणजे भृगु हें दैवत मानणारे लोक असें मानणें युक्त होईल.

इन्द्राने भृगूंना धन दिल्याचें कोणी ऋषि प्रत्यक्ष सांगत नाही. परंतु अशी कांही तरी आख्यायिका प्रचलित झालेली दिसते. एकजण इन्द्रापाशी याचना करतो की ज्या वीर्ययुक्त स्तोत्रानें तूं यतींना व भृगूंना धन दिलेंस; ज्याने तूं प्रस्कण्वाचें संरक्षण केलेंस तें स्तोत्र मला कळण्याकरतां मी मागतों[२३]. ह्या मंत्राचा अर्थ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नीट लागत नाही. निरनिराळीं भाषांतरें केलीं आहेत. "पूर्व चित्तये" व "धने हिते" हे शब्द दुर्ज्ञेय आहेत.

एका संदर्भात तुर्वश आणि द्रुह्यु ह्यांच्या बरोबर भृगूंचें नांव आलें आहे. तुर्वश द्रव्य मिळावें म्हणून यज्ञ करण्याच्या इच्छेने पुढे सरसावला. माशांप्रमाणे जाळयांत अडकवलेले द्रुह्यु व भृगू ह्यांनी (तुर्वशाला) पाहिजे होते तें मिळवून दिलें (श्रुष्टिचक्रुः). दोन शत्रूंमध्यें (विषूचोः) मित्राने मित्राला तारलें.[२४] ह्या ऋचेंत तत्कालीन सर्वश्रुत इतिहास सूचक शब्दांत सांगितला आहे. आज मात्र हजारों वर्षांचा काळ लोटल्यावर आपणांस तो इतिहास माहीत नसल्यामुळे ऋचा दुर्बोध वाटतात. शिवाय एक ऋचा म्हणजे एका प्रकरणांतील एक वाक्य मानावयाचें का स्वतंत्र प्रकरणच समजावयाचें हें प्रथम निर्णित व्हावयास पाहिजे. ऋषीने एकच ऋचा उच्चारिली की अनेक ऋचा एकाच प्रसंगीं किंवा कालीं उच्चारल्या हें ठरविल्यावांचून अर्थ करूं पाहणें व्यर्थ आहे. प्रकरण म्हणजे सूक्त मानलें तर सबंध सूक्त एका माणसाचें व एकाच प्रसंगाने म्हटलें होतें ह्याला प्रमाण काय ? ह्या अनिश्चिततेमुळे ऋग्वेद नेहमीच दुर्बोध राहणार अशी भीति वाटते. द्रुह्यूला इन्द्राने बुडविल्याचा उल्लेख आहे.[२५] इन्द्राने द्रुह्यूच्या अनुयायांनाहि हात दाखविला.[२६] उलट, इन्द्राग्नींना एक ऋषि विनंती करतो कीं तुम्ही द्रुह्यु, अनु, पुरु, यदु किंवा तुर्वश ह्यांच्या घरीं असलां तरी तेथून माझ्याकडे सोम पिण्यास या.[२७] द्रुह्यु हे पराक्रमी होते. ऋषि इन्द्राची प्रार्थना करतो कीं, जें कांहीं सामर्थ्य द्रुह्यु व तृक्षु ह्यांमध्यें आहे तें आम्हांस द्या.[२८] ऋग्वेदांत आणखी एकाच ठिकाणीं द्रुह्यूंचा उल्लेख आहे.[२९] येथे मंत्रकार अश्वींना प्रार्थितो कीं, तुम्ही द्रुह्यु, अनु, तुर्वश आणि यदु ह्यांच्याकडे असाल तरी त्यांना सोडून माझ्याकडे या. ह्यांत पुरू गळला आहे हें ध्यानांत धरावें. ह्या सर्व उताऱ्यांत भृगूंचें नांव नाही. भृगूंचें नांव द्रुह्यूंशी एकाच स्थळीं निगडित झालेलें आहे. ह्या ऋषीची माहिती चुकीची नसेल कशावरून ?

सोमरस काढीत असतां होणारा आवाज कुत्रा न ऐको. हे स्तोते हो, भृगूंनी मखाला ठार केलें तसें तुम्ही ह्या विघ्नकर्त्या कुत्र्याला मारून टाका.[३०] ह्यांत भृगूंनी मखाला मारल्याची नवीन माहिती आहे. हा मख कोण तेंहि माहीत नाही.

भृगवे मातरिश्वा अग्निं रातिंभरत्=भृगूंकरता मातरिश्व्याने अग्नीला अनुकूल केलें हें आपल्यापुरतें सार एका ऋचेचें आहे.[३१] ह्यांतील भृगु शब्द ऋषिवाचक असावा. अग्नि वनाग्नि असेल. वृक्षांना जाळून टाकणाऱ्या अग्नीचीं वर्णनें आहेत. वनांत यज्ञहि होत. वारा सुटला की, अग्नि भडकतो आणि जंगलाचा फडशा करतो. जंगल साफ करून ती जागा राहण्यास व शेतीस उपयुक्त करून घेणें हा एक असा यज्ञ करणाराचा हेतु असतो.

आतां भृगवः शब्द ज्यांत आहे अशी एकच ऋचा राहिली.[३२] अर्थ अस्पष्टच आहे. स्तोत्रें करणाऱ्या भृगूंनी अग्नीची दोन प्रकारची (द्विता) उपासना केली (उपवोचन्त) हा ह्या ऋचेचा मतलब. ह्या मंत्रांत भृगवः शब्द दोनदा आला आहे. ह्यापैकी, एकाचा अर्थ हविषां पापानांच भ्रष्टारः असा सायनाचार्य करतात. उपवोचन्त हें क्रियापद एकच आहे.' ह्यासाठी सायणांना दुसऱ्या भृगवः चा अर्थ निराळा करावा लागला. नमस्यन्तः व मथ्नन्तः हीं दोन विशेषणात्मक क्रियापदें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहेत. ऋग्वेदांत शब्दांच्या द्विरुक्तींचीं उदाहरणें विपुल आहेत. विशेषनामांची द्विरुक्ति कमी; पण नाही असें नाही. तेव्हां निराळा अर्थ करण्याची अपरिहार्यता तितकीशी वाटत नाही. तथापि ह्या दुसऱ्या भृगवः शब्दाच्या धात्वर्थाकडे लक्ष वेधणें अवश्य आहे. दोन प्रकारची उपासना कोणती हें मात्र समजत नाही.

एका ऋचेंत भृगवाण असें एका ऋषीचें नांव आलें आहे.[३३] तेथे भृगवाणे=भृगौ असें सायण म्हणतात पण कोणत्या आधाराने तें कळत नाहीं. भृगवाण हा निराळाच ऋषि असावा.

येथवर ज्या ज्या ऋचांत भृगु अथवा भृगवः शब्द आला आहे त्या सर्व ऋचा तपासल्या. पहिली गोष्ट मनांत भरते ती ही कीं, भृगु शब्दाचा एकवचनी प्रयोग २० स्थलांपैकी फक्त तीन स्थळीं आला आहे. ह्या गणनेंत और्वभृगु व भृगवाण ह्या ऋषींचीं नांवें गाळलीं आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे भृगवः शब्दाचे, १ सूर्याचे किरण २ सुतार ३ पापें दग्ध करणारे व ४ ह्या नांवाचे ऋषी, असे चार अर्थ सायनांनीच केले आहेत. भृगवः ह्या आकाशस्थ देवता आहेत ह्यांत शंका नाही. ह्या संदर्भात अनेकवचनी प्रयोग असल्याने ह्या देवतेचें एकात्मक स्वरूप नाही असें मानणें प्राप्त आहे. सूर्याचे किरण हा सायनाचार्यांचा तर्क ह्याबाबतींत जमेस धरणें युक्त होईल. तसेंच भृगु नांवाचे ऋषी असावेत हेंहि तितकेंच निरपवाद आहे. ह्यावरून मूळचें अंतरिक्षांतील दैवत ज्यांनी स्वीकारलें ते आपणांस भृगु म्हणूं लागले हा निष्कर्ष स्वीकारणें भाग आहे.

टीपा

१	राजवाडे निरुक्त पृ. २०८	१६	ऋ. ६–१५–२
२	आपटे संस्कृत इंग्लिश कोश	१७	ऋ. ८–३–१६
३	ऋ. १०–४६–९	१८	ऋ. ४–१६–२०; १०–३९–१४
४	ऋ. २–१–१	१९	ऋ. ८–४३–१३
५	ऋ. २–४१–२०; १०–४६–९;	२०	ऋ. ८–१०२–४
६	ऋ. १–११३–२;	२१	ऋ. ४–७–१
७	ऋ ८–३५–३	२२	ऋ. ८–६–१८
८	ऋ. १–१४३–४	२३	ऋ. ८–३–९
९	ऋ. ३–५–१०	२४	ऋ. ७–१८–६
१०	महाभारत १२–३८–१९	२५	ऋ. ७–१८–१२
११	ऋ. २–४–२	२६	ऋ. ७–१८–१४
१२	निरुक्त (मराठी) पृ. ६४९	२७	ऋ. १०–१०८–८
१३	आपटे संस्कृत इंग्लिश कोश	२८	ऋ. ६–४६–८
१४	ऋ. १०–४६–२	२९	ऋ. ८–१०–५
१५	ऋ. १–५८–६	३०	ऋ. ९–१०१–१३ इ. इ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'नव काव्यांतील विफलता' व बेडेकरांचा साम्यवादी प्रचार

पां. व. गाडगीळ

★

सध्या मराठी नियतकालिकांतून 'नवकाव्या' संबंधी मोठीच खडेजंगी चर्चा चालू आहे. त्या चर्चेतूनच 'नव काव्याची विफलता' हा वाद जन्मास आलेला आहे. हा वाद सुरू करण्याचें सारें श्रेय पुण्याचे साम्यवादी सज्जन श्री. दि. के. बेडेकर यांना आहे. मागे पंधरा वर्षांपूर्वी बेडेकरांचेच एक पक्षबंधू भाई लालजी पेंडसे यांनी साहित्य आणि समाजजीवन हा ग्रंथ लिहून मराठी टीकेच्या सोज्वळ क्षेत्रांत लालबावटा फडकविला व स्वतःचें नांवहि गाजविलें. लालजींच्या ठिकाणीं अभ्यासापेक्षा उत्साहच जास्त होता. तसाच उत्साह बेडेकरांच्या ठायीं आहे. बेडेकरांनी लालजींप्रमाणे धोपटमार्गी टीका केलेली नसली तरी त्या टीकेची जात एकच आहे. बेडेकर साम्यवादी मतप्रचार करण्यांत लालजींपेक्षा जास्त कुशल ठरलेले आहेत. डॉ० ग्रामोपाध्ये यांनी म्हटल्याप्रमाणे बेडेकरांची टीका अशा तऱ्हेने मांडलेली असते की 'सर्वसामान्य वाचकांना त्यांचा युक्तिवाद अगदी बिनतोड वाटावा. मार्क्सवादी विद्वत्तेचें ठिकठिकाणीं प्रदर्शन करीत मार्क्सवादी मूल्यांचीं तर्कटें रचीत ते आपला दृष्टिकोण मांडतात. वाङ्मयाचे भाबडे विद्यार्थी त्यांच्या विद्वत्ताप्रचुर लेखनाने व मार्क्सवादी परिभाषेनें दिपून जातात आणि मग बेडेकरांचा साम्यवादी पक्षाचा 'छुपा' प्रचार त्यांच्या लक्षांत येत नाही. बेडेकरांच्या विवेचनांतील ग्यानबाची मेख इथेच आहे. मार्क्सवादी परिभाषेने दडपून गेलेल्या वाचकांना बेडेकरांची 'जुगत' लक्षांत येत नाही. बेडेकरांच्या साम्यवादी प्रचाराचा दंभस्फोट करण्यासाठीच हा लेखाचा खटाटोप आम्हीं केलेला आहे.

बेडेकर हे लालजींची समाजशास्त्रीय टीका मान्य करीत नाहीत. त्यांनी नागपूरच्या व्याख्यानांत सांगितलें की साहित्याचा प्रांत हा स्वायत्त आहे. आणि साहित्याची मीमांसा साहित्यशास्त्राच्या तत्वांनुसार झाली पाहिजे. या विधानावरून कोणालाहि असें वाटेल की बेडेकर हे कलामीमांसेच्या प्रश्नांत पक्षांध नाहीत आणि साहित्याच्या परीक्षणांत तें मार्क्सवादी ठोकळेबाजी करणार नाहीत. परंतु तसें झालेलें नाही. बेडेकरांनी काव्यमीमांसा करितांना वर्ग व वर्गसंज्ञा या मार्क्सवादी कल्पनांचें जंजाळ (Fetish) माजविले आहे. त्यांच्यामते मराठी साहित्यांत इंग्रजी राजवटींत पैदा झालेली व जिच्यावर जुन्या परंपरागत विचारांची छाया आहे अशी मध्यमवर्गाची संज्ञा प्रगट झालेली आहे. आणि याच मध्यमवर्गाच्या संज्ञेंत मर्ढेकर, रेगे, भावे, माडगूळकर आणि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कुसुमाग्रज हे कवि अडकून पडलेले आहेत. सुशिक्षित मध्यमवर्गाची संज्ञा केविलवाणी व विकल झालेली आहे आणि म्हणून आजच्या नवकाव्यांत भ्रमनिरास, विफलता, वंचना व 'विषण्ण सौंदर्य' यांचें चित्रण आढळतें. हें सिद्ध करण्यासाठी त्यांनी माडगूळकरांच्या एका कवितेबाबत केलेलें संपूर्ण विवेचन उथळ आहे. कवीला असें वाटलें की, आज मिळालेलें स्वातंत्र्य नकली आहे. आणि खरें स्वातंत्र्य (अर्थात् आर्थिक स्वातंत्र्य) आपणाला मिळालेलें नाही. पारतंत्र्यापेक्षाहि आजचें जिणें जास्त कष्टप्रद झालेलें आहे आणि त्याने 'झाडावरती रडतो राघू' ही कविता लिहिली. बेडेकरांच्यामतें 'नकळत झालो बंधमुक्त मी' या अनुभवामध्ये सुशिक्षितांच्या वर्गसंज्ञेचा दुहेरी आंधळेपणा उघड झालेला आहे. 'नकळत' या शब्दाने कवीचें म्हणजेच सुशिक्षित मध्यमवर्गाचें अज्ञान दिसून येतें. त्याला कामगारवर्गाने दिलेल्या लढ्याची दखलहि नाही. आणि म्हणून 'नकळत' मुक्तीचा प्रत्यय सुशिक्षित वर्गाला आलेला आहे. बेडेकरांनी कामगारांच्या विराट लढ्यांची एक यादीच दिलेली आहे. सुशिक्षित मध्यमवर्गीयांना बेडेकरांनी नमूद केलेल्या लढ्यांची माहिती तर आहेच पण त्याबरोबर कामगारांच्या देशबुडव्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी १९३१ व १९४२ चळवळीच्या सुमारास केलेला राष्ट्रद्रोहहि माहित आहे. कामगारचळवळींत फाटाफूट करण्यासाटी केलेल्या त्यांच्या कारवायाहि माहित आहेत. 'लोकयुद्धा'ची फसवी घोषणाहि माहित आहे, आणि हेंहि माहित आहे की, साहेबाने सत्तेचें दान सोडलें तें कम्युनिस्टांनी केलेल्या कामगार चळवळींमुळे नव्हे तर १९४२ च्या राष्ट्रीय आंदोलनामुळे, खलाशांच्या बंडामुळे व सुभाषचंद्र बोस यांच्या I. N. A. मुळे. बेडेकरांनी एकाहि राष्ट्रीय चळवळीचा उल्लेख केलेला नाही आणि तें बरोबरहि आहे. कारण राष्ट्रवाद ही एक प्रतिगामी विचारसरणी आहे ना! बेडेकरांनी स्वतःबद्दल फार मोठा गैरसमज करून घेतलेला दिसतो. जें त्यांना माहित आहे तें इतरांना माहित नाही अशी त्यांची समजूत झालेली दिसते. उद्यां एखाद्या कवीने आजच्या स्वातंत्र्याबद्दल एखादी अतिरंजित कविता लिहिली तर हेच बेडेकर म्हणतील काय बेटा वेडा कवि आहे! स्वातंत्र्याचें मुख्य सार जें आर्थिक स्वातंत्र्य अगर आर्थिक समता अजून आपल्या तथाकथित स्वतंत्र देशांत प्रस्थापित झालेली नाही आणि धनिकशाहीची अनियंत्रित सत्ता चालू आहे तरी हा कवि मोठ्या उत्साहाने स्वातंत्र्याचे पवाडे गातो आहे! सुशिक्षित मध्यम वर्गाची संज्ञा आंधळी झालेली आहे हें निश्चित! बेडेकरांचें तर्कट वाचून त्यांच्या रसिकतेसंबंधी व समंजसपणाविषयीं शंका येते. कलेच्या निकषांची व मूल्यांची दखल न घेतां केलेली कोणचीहि कलामीमांसा अपुरीच राहील. बेडेकरांनी समाजसापेक्षतेवर भर दिलेला आहे व हें करीत असतांना विशिष्ट समाजरचनेचा प्रचार करणाऱ्या कलावंतांचा त्यांच्या कलाकृतींतील अवगुणांकडे व उथळपणाकडे दुर्लक्ष करून पुरस्कार केलेला आहे. कलानंदाचा विचार करतांना कवीने आशावाद प्रगट केलेला आहे की विफलता प्रगट केलेली ह्या गोष्टी गौण मानल्या पाहिजेत कारण आशावाद अगर विफलतावाद डॉ. ग्रामोपाध्ये यांनी म्हटल्याप्रमाणे हें वाङ्मयाचें व्यवच्छेदक लक्षणच नव्हे. बेडेकरांनी नवकवींचे दोन वर्ग कल्पिले आहेत. कोणत्याहि समाजाचे दोन वर्ग कल्पिणें टीकेसाठी मोठें सोईस्कर असतें. जसें गरीब व श्रीमंत, गिरणगांवकर आणि गिरणीमालक, साम्यवादी (कम्युनिस्ट) व भांडवलवादी (कॅपिटॅलिस्ट),

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुरोगामी व प्रतिगामी. साहित्यकारांचे दोन वर्ग कल्पिले म्हणजे टीकाकारांला त्याला टीकास्पद वाटणाऱ्या वर्गावर टीका करणें सुलभ होतें. पुरोगामी व प्रतिगामी हीं दोन विशेषणें घ्या. साम्यवाद्यांना असें वाटतें की, जगांत पुरोगामी विचारसरणी फक्त साम्यवादच आहे आणि जे साम्यवाद मानत नाहीत ते प्रतिगामी. पुरोगामी साहित्य म्हणजे कोणचें तर जें भौतिकतेचें अनुयायी आहे, जें साम्यवादाची घोषणा करतें, जें 'लाल' क्रांतीची गर्जना करतें तें साहित्य आणि प्रगतिशील साहित्यिक कोण तर जो साम्यवादी तमाशे लिहितो, स्टॅलिनग्राडचा पोवाडा लिहितो, सोव्हिएट समाजरचनेचा उद्‌घोष करतो अगर इतिहासाच्या नियतीवर भाविकपणे विश्वास ठेवून बालिश आशावादी गीतें रचतो. आणि हें जे कलावंत करीत नाहीत ते मध्यमवर्गीय, आंधळे, प्रतिगामी. बेडेकरांनी नवकवींचे दोन वर्ग पाडले. एक आशावादी व दुसरा निराशावादी (म्हणजेच विफलतावादी). आशावाद्यांचे अग्रणी अनिल तर विफलतावाद्यांचे मुखंड मर्ढेकर. या दोघांनाहि परंपरा आहे. अनिल हे केशवसुतांप्रमाणे व्यक्तिनिष्ठ मानवतावादी तर मर्ढेकर हे गोविंदाग्रजांप्रमाणे केवळ आत्मनिष्ठ. खरें पाहिलें असतां मानवतावादी कवींची परंपरा त्यांना ज्ञानेश्वरापर्यंत नेतां आली असती आणि मग बेडेकरांना आशावादी कवींची ज्ञानेश्वर ते अण्णाभाऊ साठे (वाचकहो, गालांतल्या गालांत हसूं नका) अशी नामावली सादर करतां आली असती. परंतु आजच्या सुशिक्षित वर्गाची संज्ञा इंग्रजी राजवटींत व पाश्चिमात्य भांडवलदारी संस्कृतीत जन्मलेली व वाढलेली आहे म्हणून त्यांनी आशावादी कवींची परंपरा केशवसुतांपासून गृहीत धरलेली आहे. बेडेकरांचे हे लाडके आशावादी कवि कसे आहेत ते ऐका ! मध्यमवर्गाच्या संज्ञेबाहेर गेलेले, मानवतेवर श्रद्धा ठेवून शूरपणे लढण्याची व अंतिम विजयाकडे दृढतेने पाहण्याची ताकत ठेवणारे, विश्वबंधुत्वाचें ध्येय ठेवणारे, श्रमजीवी जनतेशी सख्य करणारे, विज्ञानाच्या व विवेकाच्या शक्तींवर श्रद्धा ठेवणारे, समाजाच्या भीषणतेवर प्रहार करून उठणाऱ्या कामगार वर्गाने सुरू केलेली क्रांति आणि तिच्यांतून व्यक्त होणारा आशावाद आणि नवा समाज व नवसंस्कृति निर्माण करण्याची ईर्षा बाळगणारे, नवे शिल्पकार. बेडेकरांचें हें अतिरंजित गुणगायन आशावादी कवींचें काव्य वाचल्यावर फोल ठरतें कारण त्यांनी आशावादी कवींच्या नामावळींत ज्या कवींना गोंवलेलें आहे त्यांतील कांहींचें काव्य अत्यंत उथळ व अप्रामाणिक आहे. उदाहरणार्थ शाहीर अण्णाभाऊ साठे (या कवींना कम्युनिस्ट पक्षाने ' लोककवि ' ही बहुमानाची पदवी दिलेली आहे) या कवींचें काव्य (!) तपासा. पक्षाभिनिवेशाने बेडेकरांनी अमरशेख (या कवीने एका भांडवलदार चित्रपट दिग्दर्शकाला एक पोवाडा विकलेला आहे) व अण्णाभाऊ या शब्दजुळव्यांना (versifier) आशावादी कवि म्हणून गौरविलें आहे. आम्हां अज्ञ वाचकांना अण्णाभाऊंच्या काव्यांतलें मर्म अजूनपर्यंत उमगलेलें नाही. बेडेकर जर या लोककवींच्या काव्याचें रसग्रहण करणारा एखादा लेख ' अभिरुचिसंपन्न' मासिकांत लिहितील तर आम्हां मागासलेल्या काव्यवाचकांवर बहुत उपकार होतील. अमरशेख व अण्णाभाऊ हे सुशिक्षितांच्या वर्गसंज्ञेबाहेर पडलेले आहेत कारण ते कामगार आहेत. श्रमजीवी जनतेशी सख्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही कारण ते स्वतः श्रमजीवीच आहेत; विश्वबंधुत्वाचें ध्येय त्यांच्यासमोर आहे कारण वर्ल्ड कम्युनिझमची प्रस्थापना करणाऱ्या रशियाचे व कॉमिन्फार्मचे ते अनुयायी आहेत. नवसमाज व नवसंस्कृति म्हणजेच

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कम्युनिझम स्थापन करण्यासाठी ते अविश्रांत लढत आहेत. अंतिम विजयाकडे दृढतेने पाहण्याची ताकद त्यांच्यांत आहे म्हणजेच मार्क्सप्रणीत इतिहासाच्या नियतीवर त्यांचा विश्वास आहे. कामगारवर्गाने सुरूं केलेल्या क्रांतींत ते जातीने भाग घेत आहेत म्हणजेच स्वतःला कामगार वर्गाचे एकमेव पुढारी समजणाऱ्या कम्युनिष्टांच्या गोतावळ्यांत ते सामिल झालेले आहेत आणि जो कम्युनिस्ट पक्ष धनिकशाहीच्या गजांवर धडक देत आहे त्या पक्षाचे ते कार्यकर्ते आहेत आणि सोवियत् समाजासारखी लोकसत्ताक (?) रचना होत नाही तोंपर्यंत प्रचारात्मक तमाशे, प्रहसनें, संग्रामगीतें, पोवाडे वगैरे सर्व साहित्य–साधनांचा ते प्रगतिशील राजकारणासाठी म्हणजेच कम्युनिस्ट पक्षीय राजकारणासाठी योग्य उपयोग करीत आहेत. बेडेकरांच्या मते प्रचारकांचा कलावंत म्हणून गौरव करणें अपरिहार्य आहे. कारण हें प्रचारात्मक कार्य अवश्य आहे. त्याशिवाय नव्या समाजरचनेचें सृजनकार्य अशक्यप्राय होईल! आता अमरशेख व अण्णाभाऊ सोडून इतर आशावादी कवि आहेत त्यांच्याकडे वळूं. हे इतर कवि सुशिक्षित मध्यमवर्गाचेच आहेत पण त्यांनी बेडेकरांप्रमाणे त्यांच्या संज्ञेवर पडणारीं बंधनें तोडून टाकलीं आहेत. म्हणजे त्यांनी काय केलें आहे! तर मानवतेवर अपार श्रद्धा ठेवलेली आहे आणि नव्या समाजरचनेचा उद्घोष केलेला आहे. अनिल अगर मुक्तिबोध यांचें कांही काव्य खरोखरीच उत्कट प्रचीतीचें काव्य आहे आणि त्यांच्या काव्याची मीमांसा करितांना त्यांत प्रगट झालेल्या आत्मप्रतीतीचें व भावाविष्काराचें दिग्दर्शन करावयास पाहिजे. केवळ आशावादी म्हणून त्यांचा गौरव करणें त्या कवींनाच संमत होणार नाही. काव्यकलेचें परीक्षण करितांना ती कलेच्या निकषावर तपासून पाहिली पाहिजे. तसेंच तिच्यांत प्रगट झालेल्या भावना उत्कट व जातिवंत आहेत किंवा नाहीत हेंहि पाहिलें पाहिजे. केवळ ती मानवतावादी आहे म्हणून तिचा गौरव करणें वाङ्मयीन चिकित्सेच्या दृष्टीने अनिष्ट आहे. ज्याची प्रचीतीच आलेली नाही तें सत्य सांगण्याचा कवीने जर प्रयत्न केला तर त्याचें काव्य कृत्रिम ठरेल. मग त्यांत गरिबांच्या आरोळ्या असल्या अगर कामगारांच्या किंचाळ्या असल्या तरी तें 'काव्य' या संज्ञेस पात्र ठरणार नाही. पोकळ घोषणांचा गडगडाट करणारें काव्य धीटपाठ काव्यांत जमा होतें. अलिकडचे बहुतेक नवकवि 'सीघ्रचि कवित्व जोडिलें' या कोटींतलेच आहेत. या हुकमी कवींचें कमअस्सल काव्य कोणाहि रसिकाचें हृदय हेलावूं शकत नाहीं की भावनांना स्पर्श करीत नाही. एखाद्या पक्षांध टीकाकाराने त्यांचा आशावादी अगर पुरोगामी म्हणून कितीहि गौरव केला तरी चोखंदळ दृष्टीचे रसिक कवींची योग्यता ओळखून असतात आणि त्या टीकाकाराची खोटी दांभिक प्रशस्ति कवडीमोल ठरते. एकाद्या विशिष्ट राजकीय पक्षाचा प्रचार करण्यासाठी कवि जेव्हा काव्य रचतो तेव्हा 'सत्या'चें कथन करण्याऐवजी त्या राजकीय पक्षाच्या विशिष्ट उद्दिष्टासाठी जीवनाचें असत्य चित्रण करतो आणि स्पेंडरने म्हटल्याप्रमाणे He assumes knowledge of men and future course of history which he may passionately believe but as an artist he simply has not got. बेडेकरांचा व त्यांनी गौरविलेल्या आशावादी कवींचा भविष्यावर फार विश्वास आहे. उद्यांचें जग हें श्रमजीवी मानवजातीचें (कामगारशाहीचें) आहे अशी त्यांची श्रद्धा आहे. इतिहासाच्या गतिमान प्रक्रियेवर व परिणामावर (the end–result)

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांचा विश्वास आहे. परंतु स्पेंडरने म्हटल्याप्रमाणे ते मानवी जीवनाचा साक्षात्कार झाल्याचा जो आव आणतात आणि समाजाच्या भविष्याचें ज्ञान नसतांना तें गृहीत धरून ' भविष्याच्या कारागिराचें ' जें सोंग आणतात त्यानेच त्यांची कला दांभिक फसवी व लटकी ठरते. पोकळ आशावादापेक्षा खरी प्रामाणिक विफलता प्रगट करणें खऱ्या कविवृत्तीचा मार्ग आहे. थोर मनाची विफलता तितकीच थोर असते. आणि म्हणून विषादाची, असंतोषाची अगर विफलतेची कविता लिहिली म्हणून तिचा अधिक्षेप करतां यावयाचा नाही. आजपर्यंत कोणत्याहि टीकाकाराने आशावाद आणि निराशावाद या कसोट्या साहित्य परीक्षणांत वापरलेल्या नाहीत, किंवा एखाद्या लेखकाच्या कलाकृतींत विफलता आढळते म्हणून त्याचें लिखाण निकृष्ट ठरविलेलें नाही. आशावादाच्या कसोटीवर बेडेकरांच्या नामावळींतील कोणत्याहि 'हटाकूड' कवीला एलिअट व ऑडेनपेक्षा श्रेष्ठ मानावें लागेल ! कारण त्यांनी

स्वेदाची ही अखंड गंगा
तांबडमाती काळें पाणी
गात नवीं क्रांतीचीं गाणीं
विविध मुखांनी, विविध दिशांनी
शोधित सागर संघटनेचा
स्वातंत्र्याचा नव्या युगाचा

किंवा

आकांत कां मांडता हो माझे पंचप्राण
सशक्त व्हा पाय रोवा, उद्याचीच आण
पालटतें कुणी विश्व-इतिहास-पान
जीवनाची जय बोला ! ऊंचवा निशाण

अथवा

खास उद्या उठतील
हे भुकेकंगाल
सोडून भ्रांति
करीत क्रांति
भविष्य दिसून
रोमांच स्फुरून
येत थरथरून
धडकी सरे !

अशा तऱ्हेने आशावाद प्रगट केलेला नाही. बिचारे विफलतेच्या, असंतोषाच्या, निराशेच्या गर्तेत अडकून पडले आहेत ! सोव्हियत् लोकसत्तेचें वर्गविहीन समाज-रचनेचें जग त्यांच्या आंधळ्या संज्ञेला दिसत नाही !

बेडेकरांच्या टीकेतून असेच निष्कर्ष निघतात. काव्याचें परीक्षण करीत असतांना मार्क्सवादी टीकाशास्त्राचें जोखड पाठीवर वागविल्यामुळे व आंधळ्या पक्षाभिनिवेशामुळे त्यांच्या विचारांत गोंधळ उत्पन्न झालेला आहे. त्यांच्या लेखाला डॉ० ग्रामोपाध्ये यांनी मोठें तर्कशुद्ध व मुद्देसूद उत्तर दिलेलें आहे. तें ' युगवाणी'च्या वाचकांनी मुळांतूनच वाचावें. बेडेकरांच्या तर्कदुष्ट साम्यवादी मतप्रचाराला उत्तर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देण्याच्या हेतूनेच हा लेख लिहिलेला आहे. मराठी टीकासाहित्यांत अशा प्रचारकी टीकेला भरती आलेली आहे; तिला वेळींच बंधन घालावें या विशुद्ध हेतूने या लेखाचा एवढा खटाटोप केलेला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणांत कम्युनिस्ट पक्षाला कांहीच स्थान न उरल्यामुळे व कम्युनिस्ट पक्षाच्या अंतर्गत राजकारणांत बेडेकरांना स्थान न राहिल्यामुळे त्यांची स्थिति लेनिनने उल्लेखिलेल्या हेरोस्ट्रॅटस या ग्रीक पुरुषासारखी झालेली आहे. हेरोस्ट्रॅटसला कीर्ति मिळविण्याचा कोणचाच मार्ग न उरल्यामुळे त्याने देऊळ जाळून टाकलें. बेडेकरांची कलामीमांसा अशाच प्रचारची आहे.

आसमंत फुललें, फुललें

★

आसमंत फुललें, फुललें
आकाशाचें कमल लाजरें घनतिमिरांत उमललें
कुंचला निशेचा काळा
अवनीवर अलगद फिरला
रंग कांपरे हलके, हलके छायेंतून मिसळले
आसमंत फुललें, फुललें

पुलकित धरा अंगांगीं
कणकणास ये मधु गुंगी
धुंद कोवळ्या उल्लासाने नवथर गंध वितरले
आसमंत फुललें, फुललें

क्षितिजाच्या कम्पित ताना
पवनांत गुंफिती कवना
गहनामधुनी उन्मेषाचें उत्कट गान लहरलें
आसमंत फुललें, फुललें

सौहार्द सांवळें निथळे
वेदना तयांतुन वितळे
अव्यक्ताच्या मंथनांतुनी स्पंदन सुखद ठिबकलें
आसमंत फुललें, फुललें

तव अध्याहृत गा न्यारी
आकळली किमया गहिरी
काळोखाच्या कोशांतच अन् जीवनगूढ उकललें !
आसमंत फुललें, फुललें !

—उ. रा. गिरी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचारतरंग ★ ३ ★ चिकित्सक

★

परवा एक मोठी मौजेची बातमी वाचली. कलकत्त्यांतील कांही तरुण कवि एकत्र जमले आणि त्यांनी आधुनिक कविता लोकप्रिय करण्याची आजच्या लोकशाहीच्या जमान्यांत शोभून दिसेलशी, एक नवीन टूम काढली. विशेष रहदारी असलेल्या एका चौकांत ते जाऊन उभे राहिले आणि आपल्या कविता जाणाऱ्या येणाऱ्यांना वाचून दाखविण्याचा अभिनव उपक्रम त्यांनी सुरू केला. एका कवीने तर आपली अठरा पानांची एक प्रदीर्घ कविता तेथे वाचून दाखविली. कविता ही अत्यंत उच्च दर्जाची कला असल्यामुळे सर्वसाधारण सुशिक्षितांना तिचा परिचय करून दिला पाहिजे असें या तरुण कवींनी ठरविलें आणि दर शनिवारीं चौकाचौकांतून जाहीर रीतीने कवितांचें वाचन करावयाचें असाहि त्यांनी निर्णय घेतला !

आपला माल गिऱ्हाइकांच्या पदरीं बांधण्याकरिता कवींवर रस्तोरस्तीं आणि गल्लोगल्लीं फिरण्याची अशी पाळी यावी, ही घटना खरोखर अत्यंत चिन्त्य आहे. इतर वाङ्मयप्रकाराच्या मानाने कवितेचा वाचकवर्ग फारच मर्यादित झालेला आहे असा या घटनेचा सरळसरळ अर्थ आहे. असें कां व्हावें, याचाहि विचार होणें आवश्यक आहे. ऐतिहासिक दृष्टीने जर या प्रश्नाचा विचार करण्यांत आला तर त्याचें सयुक्तिक उत्तर सहज सापडणें शक्य आहे. इंग्रजी आमदानी सुरू होण्यापूर्वीच्या महाराष्ट्रांत मराठी गद्य हें अत्यंत उपेक्षित अवस्थेंत होतें. कवी, तत्त्वज्ञ, विचारवंत हे आपला मनोदय पद्यांतून व्यक्त करीत होते. उच्च विचारांच्या प्रचाराच्या क्षेत्रांत पद्य हें केवळ सार्वभौम होतें. गद्य नित्याच्या दैनंदिन व्यवहारांत आणि राजकारणाच्या कामकाजांत वापरलें जात होतें. गद्याच्या वापराचें हें क्षेत्र निस्संशय बरेंच विस्तृत होतें; पण त्या वापरांतून वाङ्मय निर्माण होत नव्हतें. गद्यहि त्यावेळीं लेखनिविष्ट होत होतें; पण तें जतन करून ठेवण्याच्या योग्यतेचें नव्हतें. जें जपून ठेवण्यासारखें असेल तें पद्यरूपानेच मांडलें पाहिजे, असा संकेत त्याकाळीं रूढ होता. आत्मगत भावनांचा आविष्कार करावयाचा असो, पारमार्थिक प्रमेयांचें प्रतिपादन करावयाचें असो, तात्विक ग्रंथावर भाष्य लिहावयाचें असो वा पुराणादिकांतील कथा सांगावयाची असो, त्याकरिता पद्याचें माध्यम वापरण्याची प्रथा त्याकाळीं शिष्टसंमत झालेली होती. संग्राह्य विचारांचें व्यक्तीकरण करण्याचा सगळा मक्ता त्याकाळीं जणुं कांही पद्याकडेच सोपविण्यांत आला होता. पुढे, इंग्रजांशीं संबंध आल्यानंतर आणि इंग्रजी वाङ्मयाचा व त्यांतील निरनिराळ्या वाङ्मयप्रकारांचा परिचय झाल्यानंतर ही मक्तेगिरी हळूहळू कमी होत गेली. इंग्रजीच्या संपर्कानंतर, नियतकालिकांतील लेख, निबंध, लघुकथा, कादंबरी, नाटक इत्यादि नानाविध

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मयप्रकारांचा विचारांच्या व्यक्तीकरणाकरिता उपयोग होऊं लागला. साहाजिकच पद्याचें, कवितेच्या वापराचें क्षेत्र उत्तरोत्तर आकुंचित होत गेलें. इतर अनेक वाङ्मयप्रकार उपलब्ध झाल्यामुळे, मराठी कवितेला आधुनिक काळीं आपलें पूर्वीचें ' लौकिक पठनाचें अधिष्ठान ' कायम टिकविणें अशक्य झालें.

लोकांचें रंजन आणि उद्बोध करण्याच्या कामीं निबंध, लघुनिबंध, लघुकथा, कादंबरी, नाटक, पटकथा इत्यादि गद्यप्रधान वाङ्मयप्रकार अधिक कार्यक्षम होऊं लागल्यामुळे कवितेची प्रभावकक्षा आधीचीच संकुचित झालेली, त्यांत आजच्या अति आधुनिक कवितेच्या दुर्बोधतेची भर पडली. म्हणजे, आधुनिक मराठी कवितेची लोकाभिमुखता वाढविण्याच्या बाबतींत, एकादशीच्या घरीं शिवरात्रीने पाहुणपणाला जावें असा कांहीसा प्रकार झाला. परिस्थितीमुळे आधीच आधुनिक मराठी कविता लोकपठनाच्या महद्भाग्याला आचवलेली; त्यांत पुन्हा, तिच्या अंतर्गत आशयाच्या अनाकलनीयतेमुळे त्या भाग्याला ती जवळ जवळ कायमचीच मुकली ! पण इतकेंहि असून, म्हणजे आजच्या अति आधुनिक कवितेचें आसन सर्वस्वी डळमळीत झालेलें असूनहि, तिची मिजास मात्र कांहीं निराळीच आहे ! श्री. शरश्चंद्र मुक्तिबोध या नांवाचे एक नवकवि तर नवकाव्याबद्दल अवास्तव अपेक्षा बाळगतांना दिसून येतात. ते आपल्या ' नवी मळवाट ' या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेंत म्हणतात:— " पुरोगामी नवकाव्य नुसतें सामाजिक परिस्थितीचें चित्रणच करूं पाहत नाही तर त्या समग्र सामाजिक परिस्थितीवर आरूढ होऊन तीस बदलूं पाहतें. " नव कवितेच्या सुसंगत अर्थ लावणें एकवेळ शक्य आहे; पण ज्यांतून बोधाला म्हणजे सुगमतेला मुक्ति मिळालेली आहे अशा नवकाव्याच्या आश्रयाने लोकजीवनांत क्रान्ति कशी घडवून आणतां येईल हें नीट लक्षांत येणें फार कठीण आहे !

नवकवितेचे पक्षपाती कदाचित् असा युक्तिवाद करतील की तिच्यांतील आशयाचा वैचारिक दर्जा पुष्कळच वाढलेला आहे; त्यामुळे तिचें मर्म समजून घेण्याकरिता सर्वसामान्य जनतेचा सांस्कृतिक आणि बौद्धिक दर्जा आधीं वाढविला पाहिजे. हा युक्तिवाद सहज पटण्यासारखा आहे. पण त्यावर उलट सवाल असाहि करतां येण्यासारखा आहे की लोकांचा सांस्कृतिक दर्जा वाढविण्याचें क्रांतिकार्य कविता सोडून अन्य साधनांनी घडवून आणावयाचें; मग जें कार्य आधीच घडून आलेलें आहे तें करण्याकरिताच अवतरलेल्या या नवकवितेचें काय करावयाचें ?

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समीक्षा

कोणी कुणाचें नव्हे*

मराठी कादंबरीकारांत श्री. ना. ह. आपटे यांचें स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. विद्युद्दीपांच्या मालिकेंत संथपणानें तेवणाऱ्या नीरांजनासारखें, गेल्या दोन तपांत मराठी वाङ्मयांत गाजलेल्या निरनिराळ्या 'वादां'पासून अलिप्त राहून, स्वतःच्या प्रवृत्तीनुसार, एका वेगळ्याच प्रकारच्या वाङ्मयाचें प्रवर्तन करणाऱ्या साहित्य-सेवकांत श्री. आपटे यांची प्रामुख्यानें गणना होते लोकप्रियतेच्या राजमार्गावरून जाण्याकरितां त्यांनी कुणाच्याहि शैलीचा अद्यतन पोषाख केला नाही किंवा कुणाच्याहि 'पुरोगामी' मतांचा चष्मा घातला नाही. त्यांचीं स्वतःचीं जीं मतें होतीं, त्यांच्या दृष्टीनें वाङ्मयाचें जें कार्य होतें किंवा जीवनांतील ज्या विशिष्ट मूल्यांवर त्यांची अविचल निष्ठा होती, त्यांनुसार त्यांनी आपलें वाङ्मय निर्माण केलें. आणि ह्या वेगळिकेनेंच त्यांना समाजांत एक प्रकारची लोकप्रियता अन् वाङ्मयनिर्मात्यांत एक प्रकारचें वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त करून दिलें.

लोकप्रिय वाङ्मयीन प्रवृत्तींचा स्वीकार न केल्यामुळे त्यांचें वाङ्मय जसें कांही गुणांना पारखें झालें, तसेंच अनेक दोषांपासून अलिप्तहि राहिलें. नवनवीन विचार-प्रवाहांनी आकर्षित न होता, स्थिरचित्त योग्याप्रमाणें, त्यांनी आपलें वाङ्मयसाधन केल्यामुळे त्यांत एकांगीपणा असेल, 'कारागिरी'च्या दृष्टीनें तें कमी प्रतीचें असेल पण त्यांत जिव्हाळा आहे, आत्मीयतेचा रसरशीतपणा आहे आणि वाङ्मयाच्या रूपानें सामाजिक मूल्यांत परिवर्तन करूं पाहणारा प्रांजल आशावादीहि आहे.

असल्या प्रकारचें वाङ्मय 'अभिजात' या सदरांत पडूं शकणार नाही का ? कलावादी वाङ्मयच तेवढें अभिजात असें मोठमोठे टीकाकारहि समजतात. मग कलेच्या दृष्टीनें तें वाङ्मय कितीहि हिणकस असो. कलेच्या अंतिम स्वरूपाविषयीं मतभेद नसला तरी कलावादी वाङ्मयाचें प्रचलित स्वरूप अभिजातत्वाच्या कल्पनेशीं कितपत सुसंगत आहे ? उलट, " Ancient works are classical not because they are old, but because they are powerful, fresh and healthy " ही गटेची अभिजातत्वाची व्याख्या मान्य केली, तर कलेच्या नांवाखालीं धुडगूस घालणाऱ्या व कलेच्या अंतिम मूल्यांशीं विसंगत असलेल्या या 'अभिजात' वाङ्मयाची काय स्थिति होईल ?

कलेची आजची दृष्टि लावली तर सारेंच कलावादी वाङ्मय ज्याप्रमाणें अभि-जात ठरूं शकत नाही, त्याचप्रमाणें आजच्या दृष्टीनें कलावादी नसलेलें [आज कारागिरीलाच किंवा तंत्रबद्धतेलाच कला समजतात] पण जीवनाच्या अंतिम मूल्यांशीं सुसंगत असलेलें कोणतेंहि ललितवाङ्मय 'अभिजात' या सदरांत पडण्याला हरकत राहूं नये. मात्र त्याच्या प्रत्येक वाचनापासून मनाला नवा आनंद व बुद्धीला नवें स्फुरण मिळालें पाहिजे.

श्री. ना. ह. आपटे यांची वाङ्मयीन भूमिका खेळीमेळीनें उपदेश करणाऱ्या प्रेमळ आजोबासारखी आहे. घरांतल्या मंडळींना विश्वासांत घेऊन, त्यांच्याशीं समरस

*स्वतंत्र सामाजिक कादंबरी–ले. नारायण हरी आपटे. प्र. दि. मा. धुमाळ; नागपूर प्रकाशन, नागपूर; पृ. ३२८; किं. ५ रु.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होऊन त्यांचें चुकतें कुठे हें किंचित् अधिकारवाणीने सांगणें हीच त्यांची वाङ्मय-विषयक भूमिका. या भूमिकेंत शिक्षकाचा कठोरपणा नाही. आजोबाचा प्रेमळपणा आहे. समाजाच्या प्रचलित मूल्यांत परिवर्तन व्हावें असें डॉ. केतकरांच्याप्रमाणे त्यांनाहि वाटतें. पण केतकरांची दृष्टि शास्त्रज्ञाची आहे, तर आपल्यांची दृष्टि जुन्यालाच चिकटून बसणाऱ्या भाविकाची आहे. जुन्या समाजनियमांचें उन्मूलन करून नवीं सामाजिक बंधनें अस्तित्वांत यावींत असें केतकरांच्या विश्लेषणात्मक प्रतिभेला वाटतें, तर जुन्या समाजबंधनांपासून दुरावत चाललेला आपला समाज पुन्हा तीं बंधनें पाळील तर सुखी होईल असें आपल्यांना वाटतें. प्रचलित सामाजिक मूल्यांत परिवर्तन व्हावें असें जें या दोघांनाहि वाटतें, तें या वेगवेगळया दृष्टीने.

हें सांगण्याचें कारण असें, की प्रस्तुत कादंबरींत नायिकेच्या रूपाने एक सामाजिक समस्या सोडविण्याचा आपल्यांनी प्रयत्न केला आहे. पांढरपेशा कुटुंबांतील सुशिक्षित मुलींच्या विवाहाचा प्रश्न हा आजकालचा एक फार मोठी सामाजिक समस्या आहे. मुलगी स्वतः सुशिक्षित असल्यामुळे तिचींहि कांहीतरी मतें असतात. आईवडिलांना वाटतें, आपली मुलगी आता मोठी आहे, तिला एकदाचें उजवून टाकावें. पण मुलींना वाटतें, अशा रीतीने कुणाशी तरी लग्न करण्यापेक्षा आपला सहचर आपण स्वतःच निवडावा. नव्हे, त्याला प्रेमाने आपल्याकडे खेचून आणावें. तरच आपल्याला विवाहित जीवनाच्या अलकानगरींत प्रवेश केल्याचें खरेंखुरें समाधान लाभेल. आईवडिलांचीं मतें आणि मुलींची भावना यांच्यांत असा संघर्ष असल्यामुळे भरल्या घरांत मुलींना वाटू लागतें, ‘ कोणी कुणाचं नाही...’

मुलींची भावना प्रामाणिक असते यांत शंका नाही. पण प्रामाणिकपणाला प्रामाणिकपणानेच उत्तर मिळतें का ?—प्रामाणिकपणाचा आव आणून मुलींच्या प्रामाणिक भावनेला आधी उत्तेजन अन् मग तिची फसवणूक करणारे तरुण समाजांत कांही थोडेथोडके नाहीत. मुलाच्या भावनेंतला प्रामाणिकपणाचा मुलामा निघून गेल्यानंतर किंवा मुलीच्या तो प्रत्ययास आल्यानंतर मुलीला पुन्हा वाटतें, ‘ कोणी कुणाचं नाही...’

पण एकदा एखाद्या मुलाच्या सहवासांत आल्यानंतर व त्याचा गवगवा झाल्यानंतर अशा मुलीचें लग्न होणें कठिण जातें अन् मग तिला कुणाशी तरी लग्न करून आपलें सारें जीवन व्यतीत करावें लागतें. मात्र त्या जीवनांतहि ‘ कोणी कुणाचं नव्हे.....’ ही कडवटपणाची भावना शिल्लक राहतेच अन् कधी कधी, त्या भावनेचा प्रकर्ष झाला म्हणजे तिचें वैवाहिक जीवनहि कडवटून जातें.

ह्या कादंबरीची नायिका सिंधू ही अशा मुलीचा नमुना आहे. पण मुलींनी अशा प्रसंगी कसें वागावें त्याचेंहि दिग्दर्शन आपल्यांनी तिच्या रूपाने केलें आहे. प्रेम हें आंधळें असलें तरी तें डोळसपणाने करावें लागतें असेंच आपल्यांना त्यांतून सुचवायचें आहे.

मुलीच्या संपत्तीवर डोळा ठेवून तिच्यावर प्रेम करणारा राजाभाऊ, साठीच्या घरांत आल्यावरहि समाजसेवेच्या नांवाखाली लिझा कोलेट या मिशनरी बाईशी संबंध ठेवणारे अप्पासाहेब, वैधव्य येतांच आनंदाने बेभान होणारी जिजी अन् सिंधूचें आपल्यावर खरेंच प्रेम असेल की नाही या भावनेने वारंवार साशंक होणारा डॉ. सदानन्द—हीं सर्वच पात्रें आपापल्या परीने वाचकांच्या हृदयाचा ठाव घेतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण या सर्वांपेक्षा सिंधूच आपल्याला अधिक आवडेल. भावनाशील पण विवेकी, स्वतःच्या भावना दुसऱ्यावर लादणारी पण दुसऱ्याच्याहि भावना तितक्याच समंजसपणाने समजावून घेणारी अशी ही नायिका निर्माण करून मुली कशा असतात, पण त्यांनी कसें असावें हें आपल्यांनी यशस्वी रीतीने सांगितलें आहे. तिच्या संयमित भावनेचें एकच उदाहरण देतों. ती म्हणते, 'काय रे बाळ, प्रणयिनीच्या हृदयांत असे कांही भाव उसळतात हें ठीक. मिटक्या मारीत कवीने ते सांगावे, गायकाने ते गावे व तुमच्यासारख्या फक्कडरावांनी ते ऐकावे व डोलावे हें ठीक.—पण तुम्ही पुरुष त्या लायकीचे असतां ?——" [पृष्ठ. ८९]

एक शंका! नटांना डोळ्यासमोर ठेवून पूर्वी नाटककार नाटक लिहीत असत. चित्रपटतंत्राचा अवलंब करणारे कादंबरीकारहि असेच करीत असावेत. श्री. आपटे यांनी प्रस्तुत कादंबरींतली सिंधूहि कुणातरी तडफदार मराठी नटीला डोळ्यांसमोर ठेवून तर निर्माण केली नाही ?—

श्री. आपटे यांचें मराठी वाङ्मयांतलें स्थान स्वतंत्र आहे. वाङ्मयीन वादांच्या रणधुमाळींत न पडतां सामाजिक समस्यांचें नाजुक हाताने रहस्योद्घाटन करून त्यांवर आजोबांच्या प्रेमळपणाने अन् जिव्हाळ्याने उपाययोजना सुचविण्याचें कौशल्य त्यांच्यांत आहे. पुढल्या कादंबरींत मुलाची बाजू घेऊन त्याच्या जीवनांतील कांही नाजूक भागावर ते प्रकाश पाडतील अशी आशा केल्यास ती व्यर्थ होईल कां ?—

शेवटीं अभिवंदन प्रकाशक श्री. धुमाळ यांचें. कारण कुठल्याहि वस्तूच्या अंतरंगाशीं परिचय होण्यापूर्वी तिच्या बहिरंगाशींच परिचय होतो. अन् त्यामुळे त्या वस्तूबद्दल सुरुवातीलाच अनुकूल-प्रतिकूल ग्रह होतात. बहिरंगाचें सौंदर्याने वस्तूच्या अंतरंगांत शिरण्याचा मोह पाडण्याचें कार्य प्रकाशकांचें असतें. ह्या दृष्टीने कादंबरीच्या मुखपृष्ठापासून तो तिच्या छपाई व बांधणीपर्यंत साऱ्याच गोष्टी सुरेख केल्याबद्दल श्री. धुमाळ यांनाहि धन्यवाद!

—सुरेश म. डोळके

★

गृहिणी*

टॉलस्टॉयच्या 'Kreutzer Sonata' या अतिशय गाजलेल्या कादंबरीचा हा मराठी अनुवाद आहे. मनुष्याच्या अतिशयित कामुकतेचें हें एक भडक आणि चीड आणणारें चित्र लेखकाने अत्यंत कडक शब्दांत चितारलें आहे. एकूण सर्व कादंबरींत कथेपेक्षा विचारांचेंच आधिक्य अनुभवास येतें. पोजडिनिचेफ हा एक रशियन सुखवस्तु गृहस्थ अतिरेकी कामासक्तीमुळे विस्कटून गेलेला स्वतःचा संसार पाहून अत्यंत उद्वेगाने पण तळमळीने किंचित् विक्षिप्त भासणारे स्वतःचे विचार स्वतःच सांगतो आहे. स्वैराचारी पत्नीचा, संशयपिशाचाने पछाडला जाऊन, हा खून करतो. पण कोर्टात मात्र वेडा ठरून मोकळा सुटतो. आणि त्यानंतर गाडींतल्या सहप्रवाशाला तो आपली कथा व ओघानेच आपले विचारहि सांगतो असें या कादंबरीचें स्वरूप आहे.

*अनुवादक—प्रा. गं. भा. निरंतर, सुरस ग्रंथमाला प्रकाशन पंढरपूर.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कथेच्या दृष्टीने पाहूं गेल्यास कादंबरीच्या पूर्वार्धांत प्रवचनाचेंच प्राबल्य आढळतें. उत्तरार्धांत मात्र कथा परिणामकारक आहे. विशेषतः संशयग्रस्त कथानायकाचें मनोविश्लेषण तर बहारीचें उतरलें आहे. पण वर म्हटल्याप्रमाणे सदर कादंबरींत विचारांनाच अधिक महत्व असल्यामुळे त्यांचेंच मूल्यमापन करावें लागेल. अधोगतीच्या निकृष्टावस्थेस पोहोंचलेला रशियांतील भ्रष्ट समाज व लेखकाची त्यावरील प्रखर टीका उद्‌बोधक आहे.

कथानायकाच्या तोंडून वदविलेलीं लेखकाचीं मतें तर प्रथमदर्शनीं विक्षिप्तच वाटतात. "खरें प्रेम म्हणजे केवळ कल्पना ! आपण ज्याला प्रेम म्हणतों तें निव्वळ वासनेवर आधारलेलें असून अल्पकालीन असतें." "मधुचन्द्र म्हणजे कायदेशीर व्यभिचार आणि विवाह म्हणजे विधिपूर्वक विक्री." "स्त्रियांचा आणि वेश्यांचा जीवितहेतु अभिन्न." "कामुकतेपासून सुटका करून घेण्यास संपूर्ण ब्रह्मचर्य हाच एक उपाय. मग त्याने मानवजातीची वाढ बंद झाली तरी हरकत नाही." वगैरे मतें तर कमालीचीं विक्षिप्त, अतिरेकी व एकांगी वाटतील. आणि त्यांतील कित्येकांवर वादहि पण घालतां येईल. पण त्याआधी कादंबरीची पार्श्वभूमि रशियन समाज असल्यामुळे आपल्या रूढ कल्पनेंतून आपण त्यांचें मूल्यमापन करूं शकत नाही. पुन्हा हे विचार एका संतापलेल्या व्यक्तीचे आहेत हें लक्षांत घेऊन त्यांत संतापसहज अतिशयोक्ति आणि एकांगीपणा येणारच हें गृहीत धरावयाला हवें. आणि त्यांतील मूलभूत तथ्यांश तेवढा विचारांत घ्यावयास हवा. या दृष्टीने पाहतां मनुष्याची अतिरेकी कामुकता, त्याने स्त्रीला बनविलेलें उपभोगमात्र साधन आणि आधुनिक नटवी स्त्री तरुण मनाला पाडत असलेली घातुक भुरळ या गोष्टी सखोल विचारानंतर नाकारतां येणार नाहीत. त्याचप्रमाणे संपूर्ण ब्रह्मचर्याचा सुचविलेला मार्ग जरी सर्वस्वी अव्यवहार्य असला तरीपण मर्यादित ब्रह्मचर्याची निकड मुळीच नाकारतां येणार नाही. कांही मतें मात्र सपशेल न पटणारीं आहेत. प्रेमांतील वासनेचें अस्तित्व मान्य करूनहि प्रेम निव्वळ वासनामयच असतें असें म्हणतां येत नाही. त्याचप्रमाणे मधुचंद्र, विवाह वगैरे बद्दलचीं लेखकाचीं मतें एक भिन्न दृष्टीचा परिणाम आहे असें मानलें तरच क्षम्य आहेत.

पण या कादंबरींतील कांही मतें जरी पटलीं नाहीत तरी सांगणाऱ्याची तळमळ आणि त्याच्या विचारांतील अतिशयोक्ति वगळून प्रतीत होणारें विदारक व कटु सत्य मात्र डोळ्याआड करतां येणार नाही. सुधारणेच्या नांवाखाली आधुनिक जग वासनांचें दास बनून आपलीं इतर कर्तव्यें व ध्येयें विसरून तर गेलें नाही ना ? असा प्रश्न विचारशील वाचकाने स्वतःला केल्यास तो अस्वाभाविक होणार नाही. विशेषतः कथानायकाची कळकळ पीळ पडणारी आहे. केवळ या कळकळीमुळेच तो खुनी असून देखील त्याच्याबद्दल तिरस्कार न वाटतां उलट सहानुभूति वाटते.

मराठी वाङ्मयांत या अनुवादाच्या रूपाने वा. म. जोशी यांच्या सुशीलेने केलेल्या विचारक्रांतीवर ही प्रतिक्रांति प्रकट झाली आहे असें म्हटलें तर फारसें वावगें होणार नाही. या कादंबरीची पार्श्वभूमि परकी समाज असल्यामुळे आपल्या समाजाला तिच्यांतील विधानें तंतोतंत लागू पडलीं नाहीत, तरीपण विचक्षण वाचकाला विचारप्रवण करण्याचें कार्य ती उत्तमपणें बजावूं शकते. इतकें मात्र सुचवून ठेवावेंसें वाटतें कीं, यांतील विचार हे सर्वस्वी वयांत आलेल्या तरुणांसाठीच असल्यामुळे व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कामुकप्रवृत्तींचें बरेंच स्पष्ट चित्रण यांत असल्यामुळे कोवळया वयाच्या मुलांच्यां हातांत त्यांना निरुपयोगी असलेलें हें पुस्तक पडूं नये.

शेवटीं अनुवाद कसा साधला आहे हें पाहतांना कांहीं तुरळक ठिकाणचीं सदोष व विस्कळित वाक्यरचना वगळल्यास बाकी अनुवाद उत्तम वठला आहे असें आढळतें. मुखपृष्ठावरील मुळगांवकरांचें टरीव टशाचें चित्र व आंतील प्रतिपादन यांतील विरोध एकदम जाणवतो. या दोहोंकडे पाहून "गृहिणी 'अशी' आहेशी वाटते, पण वस्तुतः मात्र 'अशी' असते" असेंच या कादंबरीचें उद्बोधन असल्याचा प्रत्यय येतो.

—बाळ पांडे

★

माझा नंदादीप*

जमखिंडीसारख्या आडवळणाच्या गांवचे एक डॉक्टर कै. भालचंद्र चिंतामण पटवर्धन यांच्या पत्नीनें लिहिलेलें हें त्यांचें चरित्र आहे. डॉक्टरांनीं प्रतिकूल परिस्थितीच्या कचाट्यांत आपला अभ्यासक्रम पूर्ण केला. आणि ज्ञानलालसा स्थिर ठेवून आपल्या उदरनिर्वाहाचें साधन असणारी वैद्यकी मानवतेच्या सेवेंत व दुखणाइतांच्या शुश्रूषेंत राबवून जन्माचें सार्थक केलें. त्यांचें स्मृतिचित्र ह्या चरित्रांत लक्ष्मीबाई पटवर्धनांनीं रेखाटलें आहे. लक्ष्मीबाईंची भाषा साधी पण प्रवाही आणि शैली सुगम असल्यामुळें हें चरित्र वाचनीय व संग्राह्य झालें आहे. ज्यांना वास्तव जीवन जगावयाचें असेल आणि कल्पनेच्या आकाशांत उगाच भराऱ्या मारावयाच्या नसतील त्यांना हें चरित्र आदर्शनीय आहे.

मराठी वाङ्मयांत आपल्या पतींचीं पत्नींनीं लिहिलेलीं बरींच रमणीय व स्मरणीय चरित्रें आहेत. रमाबाई रानड्यांनीं आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणींत न्यायमूर्ति रानडे घरीं कसें असत हें यथातथ्य रीतीनें दाखविलें आहे, तर 'स्मृतिचित्रां'त लक्ष्मीबाई टिळकांनीं रेवरंड टिळक घरीं व दारीं कसे होते हें हृदयंगम केलें आहे. 'माझी कहाणी' या पुस्तकांत बायो कर्व्यांनीं समाज सेवक कर्वे गृहस्थ म्हणून कसें आहेत हें निवेदन केलें आहे, तर 'आमची अकरावर्षें' ह्या पुस्तकांत लीलाताई पटवर्धनांनी माधवज्यूलियन यांचें कौटुंबिक जीवन चित्रित केलें आहे. अगदी अलिकडे रमाबाई केदार यानी कै. केदार यांचें गृहजीवन कसें सुखी व समाधानी होतें तें वेंचलेल्या मण्यांत स्पष्ट केलें आहे. चरित्रांच्या या मालिकेंत माझ्या दीपाने एका तेजस्वी मण्याची भर पडली आहे.

पत्नीला पतीविषयीं स्वाभाविक आपुलकी व प्रीति असल्यामुळें त्याचे दोष दिसत नाहींत हें खरें म्हणून गृहीत धरलें, तरी तो तिच्याप्रमाणें इतर कोणासहि जवळून पाहण्यास मिळत नाही. तेव्हा त्याचें यथातथ्य चित्र तिला जसें रेखाटतां येतें तसें तें इतरांना रेखाटतां येत नाहीं हें मान्य केलेंच पाहिजे. म्हणूनच 'नंदादीप' एकदा सर्वांनी पाहावा अशी मी विनंति करतों.

—भ. श्री. पंडित.

*लेखिका—लक्ष्मीबाई पटवर्धन. २३ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मूल्य ३ रुपये. पृष्टे १८०.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

★

चित्रमंदिर आणि प्रतिभा*

नागपूरचे तरुण आणि कष्टाळू चित्रकार आणि कलानिपुण श्री ना. व. डिखोळे यांच्या चित्रांची मंजूषा आणि त्यांनी त्यांचे स्नेही आणि विद्यार्थी यांच्या मदतीने चालविलेली "प्रतिभे"ची जोपासना सावकाशपणें अवलोकन करावयास मिळाली. कलेच्या क्षेत्रांत प्रेमाबद्दल जें म्हटलें आहे तें तंतोतंत लागू पडतें. प्रीतीचें गोजिरवाणें फुलपांखरू औदासिन्याच्या उन्हांत जगूं शकत नाहीं. कलावंताच्या संस्कारी हृदयाचा आविष्कार पाहून उत्सुकता आणि रसिकता प्रकट केल्यानेच त्याला अधिकाधिक बहर येतो. कलावंत आत्मतोषासाठी प्रस्फुट होतो म्हणतात. पण तरी निरवधि काळाच्या कोणत्या तरी क्षणीं, विपुल पृथ्वीच्या कुठल्या तरी कोपऱ्यांत समानधर्मा कोणी निपजेल आणि तो माझ्या कृतीचें कौतुक करील अशी आस प्रत्येक कलावंताची असते.

श्री. डिखोळे यांची कलेची तपस्या उच्च प्रकारची आहे. ती विफल होणार नाही हेंहि सहजसिद्ध आहे. चित्रकलेच्या प्रत्येक क्षेत्रांत त्यांची साधना दृग्गोचर होते. नुसतें चित्रच नव्हे तर शब्द देखील त्यांनी माध्यम म्हणून आपल्या कलेच्या आविष्कारासाठी उपयोजिले आहेत. या दुहेरी प्रयत्नांतूनच त्यांच्या "चित्रमंदिरांत" "प्रतिभे"चा मंगल सोज्वळ प्रकाश फांकला आहे. आपलें निरलस कार्यप्रेम, अविश्रांत धडपड, सौजन्ययुक्त शांत वागणूक यांनी श्री. डिखोळे यांचे कलेबद्दलचे प्रयत्न उजळले आहेत. त्यांचीं चित्रप्रदर्शनें ज्यांना पहाण्याचा योग आला त्यांना या गोष्टीची साक्ष देतांना आनंदच वाटेल. श्री. डिखोळे यांनी परिस्थितीच्या अंधारांतून साधनेच्या निष्ठेमुळे प्रकाशाचा मार्ग झुंजत झगडत शोधला आहे. या त्यांच्या सतत प्रयत्नांचें प्रत्यंतर त्यांचें 'चित्रमंदिर' आणि हस्तलिखित 'प्रतिभा' नियतकालिक पाहून येतें. मानवाच्या हातीं तप, साधना निरलस सेवा करणेंच असतें. तो ज्या साध्यासाठी हें करतो तें त्याला मिळतेंच मिळतें. म्हणूनच असें म्हणावेसें वाटतें कीं ज्या मार्गानें श्री. डिखोळे यांनी पाऊल टाकलें आहे तो मार्ग त्यांच्या यशोमंदिराकडे जणाराच आहे. त्यांच्या कलेचें उत्तरोत्तर प्रकटीकरण व्हावें आणि तिचें चीज होऊन नागपूर प्रांतांतील या कलावंताचा गौरव वाढता असावा असें कुणालाहि वाटेल.

—वा. कृ. चोरघडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ये जेव्हां येणार !

★

मंगला ! ये जेव्हा येणार !
आल्यावरतीं खोटी क्षणभर नाहि तुझी करणार ! ॥ ध्रु. ॥

अजवर झालीं पापें हातुन
कधिच टाकिलीं तुजला सांगुन
मुकाट–करशिल तूं तें शासन
आहे पतकरणार ! ॥१॥

चुकून पुण्यें कधि झालेलीं
दिसलीं नशिबीं जर लिहिलेलीं
तर मी आतुर जुळिन करांजलि
कळुनि कृपा होणार ! ॥२॥

स्वस्थपणें मीं मुळि न घाबरुन
वाट बघतसें डोळे लावुन
कीं मज माझा स्वामी येउन
सांगातीं नेणार ! ॥३॥

—वा. गो. मायदेव

बालकवींची कविता

(बालकवींच्या नादमधुर आणि सरसरमणीय कवितेवर त्यांच्या जीवनाला काळवंडून टाकणाऱ्या औदासीन्याची दाट छाया पसरली आहे.)

आनंदाची गंगा वाहे एका डोळ्यांतून ।
विषण्णतेची मिळे मग तिला कालिंदी येऊन ।
या दोघींचा प्रवाह वाहे संथ तसा स्वच्छंद ।
बालकवींची कविता देई करुण–रम्य आनंद ॥

अवचित येतां दिन झाकळुनी, मेघ वर्षती धारा ।
अवचित कोमल प्रभा फांकते पसरी सूर्य पिसारा ।
मना अमळसें प्रसन्न वाटें तोंच हवा हो कुंद ।
बालकवींची कविता देई करुण–रम्य आनंद ॥

गगनदीप उजळतांच पसरे दिनःप्रभा भूवरती ।
परि मालवतां वसुंधरेवर करिते रजनी वसती ।
दिनरजनीच्या मीलनसमयीं फुलतीं मिटतीं सुमनें ।
सुखदुःखांनी हृदय भरुन ये बालकवींच्या कवनें ॥

—माधव गोपाळ जामदार

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नव्या संवेदनेचा कवि

वि. गो. रुक्मांगद

★

मराठी काव्याच्या क्षितिजावर विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत कांही नवे तेजस्वी तारे तळपूं लागले होते. बा. सी. मर्ढेकर हे त्यांतले अग्रणी. त्यांच्या बरोबरीने कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, कवि कान्त, इ. नवे तारेहि चमकत होते. या साऱ्या तारा-वृंदाचें रसिकाग्रणींनीं स्वागत केलें. यांचें निराळें तेज त्यांना जाणवलें. नव्या जाणीवा, नवे आदर्श, नवा साजशृंगार, नव्या प्रतिमा यांचे अंकुर उगवले. नव्या पिढींतल्या मार्मिकांना एक नवी सृष्टि आढळली.

फ्रॉस्ट, ईलियट, यीट्स्, एसरा पौंड, ऑडेन्, इ. पाश्चात्य महाभागांची नवीन विचारसरणीच आजच्या नवकवींनी अंगिकारली आहे. आधुनिकतम इंग्रजी वाङ्‌मयांतील प्रतीकवाद व अतिवास्तववाद यांची दाट छाया मराठी नव काव्यावर पडली हें जरी खरें असलें तरी, मानवी जीवितांतील विफलतेचा विदारक व दाहक प्रत्यय कुणाहि सखोल व विशाल सहानुभूति असलेल्या भावविवश कवीला होणें अशक्य नाही. त्यामुळे मराठी नवकाव्याचे प्रणेते श्री. बा. सी. मर्ढेकर यांच्यावर उसनवारीचा, परप्रकाशिततेचा, आरोप करणें, हें अतिशयोक्तीचें ठरेल. दोन विभिन्न-देशीय कलावंतांच्या मनोधर्मांत अनपेक्षित सादृश्य असणें अस्वाभाविक नाही. पूर्वोक्त आरोपांतील अतिशयोक्ति वगळून, मर्ढेकर हे या नवकाव्याच्या प्रेरणेबाबत पाश्चिमात्य सारस्वतांचे ऋणी आहेत, असें फार तर म्हणतां येईल. पण तो ऋणांश इंग्रजी काव्यापासून स्फूर्ति उचलण्याइतकाच समजावयाचा. मुम्बापुरीसारख्या बकाल वस्तीच्या शहरांतलें यंत्रानिर्विशेष जीवन त्यांनी अगदी जवळून न्याहाळलें आहे. व्यापक सहानुभूतिपूर्ण संवेदनक्षम कविमन जीवनाच्या प्रत्येक प्रांतांतील वैकल्यें टिपून घेतें. या दाहक अनुभूतीला भव्योदात्त कल्पकतेची जोड लाभली म्हणजे त्याचे विचार उद्‌गारांत परिवर्तित होतात. त्याची अनुभूति साकार होते. ती समुचित शब्दांचा साज स्वतःसाठी निवडून काढते. अन् या नव्या रूपांत जनतेसमोर येते. भोंवतालच्या जगांत आज सर्व मंगल व पवित्र गोष्टींचा जो उच्छेद चालू आहे, त्याचा विदारक अनुभव त्यांना पूर्णतया आलेला आहे. शुचितेचें, मांगल्याचें, पावित्र्याचें हें विडंबन त्यांच्या कोमल कविमनांत काहूर उठवितें. जळजळ उत्पन्न करते, करवतीप्रमाणे मनाला चराचर कापतें. त्या दाहकतेंतूनच त्यांच्या लेखणीने अग्निकण उडविले. त्यांच्या वाणींतून ठिणग्या बाहेर पडल्या. वास्तव सृष्टीचें हें अतिवास्तव चित्रण भोंवतालच्या जाणत्या रसिकांना रुचलें व पटलेंहि. टीकाखोर-वृत्तीच्या मंडळींनी मात्र त्याची भडक व नकली म्हणूनच बोळवण केली. या नव्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचारप्रणालीच्या प्रखर तेजाने त्यांची दृष्टि अधु झाली. ते डोळे चोळचोळून बघूं लागले स्तिमित होण्याच्या त्या पहिल्या क्षणांतच ते या कवितेला 'टाकाऊ' म्हणून मोकळे झाले. कांही त्यांतल्यात्यांत समतोल समीक्षकांनी ह्या नवीन विचारधारेचें कौतुक केलें व कांही नव्या पाश्चात्य वाङ्मयाशीं विशेष परिचित असलेल्या टीकाकारांनी तिचें योग्य समर्थनहि साभिनिवेश केलें. पण परंपरेच्या पूजेला विटलेल्या नवयुगाच्या प्रवर्तकावर टीकेची जो अविश्रांत झोड उठते, तीच विचाऱ्या मर्ढेकरांच्या वाट्यास प्रामुख्याने आली. त्यांची विचारधारा, त्यांच्या मनांतलीं वादळें, यांचा कानोसा घेण्याचा प्रत्यक्ष वा आडून असा प्रयत्न फारच थोडा झाला.

मर्ढेकर जोपर्यंत आपल्या भाव-भावनांशीं प्रामाणिक आहेत तोपर्यंत त्यांना भिण्याचें कारणच नाही. जें कांही उत्कटतेने जाणवलें, तें तळमळीने व निष्ठेने चित्रित करणें हेंच त्यांना ठाऊक. म्हणून त्यांनी सहृदयतेचा गंधहि नसलेल्या या टीकाकारांच्या शिव्यांचा अहेर, स्तुतिपाठकाच्या प्रशस्तिपर ओव्यांप्रमाणेच मानला. व नाउमेद न होतां, लेखन चालूच ठेवलें. जुनाट प्रतिमा, जुने पुराणे संकेत, जुनी विचारसरणी, जुनी शैली, या साऱ्यांना विध्वंसून लोकोपकारक समाजहितचिंतक मूर्तिभंजकाचा बाणा त्यांनी स्वीकारला. जुन्या उपमांचीं भेंडोळीं त्यांनी भिरकावून दिलीं. प्रतीकांना नवीनतेचें पाणी चढविलें. नव्या लेखनशैलीचें राज्य स्थापन केलें. नव्या समर्पक भावनिदर्शक शब्दांची टांकसाळ उघडली. नवें वातावरण, नवीं स्फुरणें, नवा वास्तववाद, निर्माण केला. नवनिर्माण हीच नव्या युगंधराची कसोटी होय. म्हणूनच आज मर्ढेकर अेक निराळाच मार्ग शोधून काढणारी काव्य-सृष्टींतली अनन्यसाधारण व्यक्ति म्हणून गौरविले जात आहेत. 'शिशिरागम,' 'कांही कविता,' 'आणखी कांही कविता,' या त्रिवर्गांनी त्यांचें वेगळेपण जगासमोर आणलें. नाविन्याची हौस म्हणूनच केवळ हें नव काव्य निर्मिलेलें नाही, हें वाच कांना पटविलें. त्यांनी नव्या युगाचा साक्षात्कार घडविला. त्यांच्या काव्यांत दुर्बोधता आहे, हें मान्य. पण जुने पण्डितकवि, शास्त्रीकवि, आधुनिकांत वी, साधुदास, केशवसुत, यांच्यांत नाही का दुर्बोधता ? नव्या युगाबरोबर पावलें टाकायचीं असतील तर नवकाव्याच्या अभ्यासकांनीं आपली बौद्धिक पातळी नको का वाढवायला ? मर्ढेकर अतिवास्तववादी आहेत, त्यांचीं वर्णनें भडक आहेत, हे आरोप व्यर्थ होत. कवीला जीं जीं दृश्यें, ज्या घटना, ज्या प्रमाणांत व ज्या स्वरूपांत आढळल्या, त्यांचें निर्भयतेने प्रामाणिक चित्रण करण्याचा प्रत्येक कवीला अलिखित आदेश असतो. कवींना 'निरंकुश' म्हणतात, तें याच अर्थाने. कवींनं आपल्याला जें खरोखर वाटतें, जाणवतें, तें निर्भीडपणें, आपल्या अनुभूतींशी निष्ठा राखून, रंगविल्यास, त्याच्या थोरपणाला बाधा येत नाही. किंबहुना अभय, प्रांजलता इ. गुण कवीच्या व्यक्तिमत्वास अलंकरणरूपच असतात. ते त्याचा मनःपिंड विकास-विण्यास उपकारकच असतात. मर्ढेकरी काव्य अपरिचिततेमुळे दुर्बोध वाटणें साहजिक आहे. आणि म्हणूनच त्यांच्या या अभिनव रचना-प्रयोगाची उपयुक्तता सिद्ध होण्यास पांच-दहा वर्षें तरी लागतीलच. अपरिचिततेच्या जाणीवेचीं अभ्रवलयें विरल्यावांचून त्यांच्या तेजस्वी विचारांची प्रभा प्रभावी ठरणार नाही. दिवसेंदिवस विकृत होत चाललेल्या जीवनाविषयींची चीड, माणुसकीला मुकलेल्या, यांत्रिक जीवनाला सरावलेल्या तुच्छ मानवाविषयींची जुगुप्सा, मांगल्याचा विध्वंस होत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असत्याबद्दलची आर्तता, कुणीतरी काव्यरूपानें आमच्यासमोर आणावी, नव्या धारणीच्या कोंदणांत तिला बसवावी, अशी जणु कांही आम्ही नकळत प्रतीक्षा करीत होतों. जो जनमनाचा कानोसा घेऊन, त्यांच्या हालअपेष्टा त्यांना जाणवून, त्यांना आशावादी बनण्याचा कालांतराने दिलासा देईल, तो नवकवि जनतेला आज ना उद्या आपल्या भावनांचा प्रतिनिधि म्हणून आवडल्यावांचून राहणार नाही. सहृदय टीकाकारहि त्याचा पुढेमागे गौरव केल्याशिवाय राहणार नाहीत. 'फलाटदादा,' 'न्हालेल्या जणुं गर्भवतीच्या—', 'पिपांत मेले ओल्या उंदिर,' 'पितात सारे गोड हिंवाळा,' इत्यादि त्यांच्या कविता लोकप्रिय होत आहेत. मर्ढेकरांनी आपल्या तरल व भव्य कल्पकता, अतिवास्तवता, उत्कृष्ट पार्श्वभूमि-निर्मिति, नवसंकेत, इत्यादि गुणांनीं मराठी काव्यवाङ्मयांत स्वतःचें वैशिष्ट्यपूर्ण स्थान निश्चित करून ठेवलें आहे. अभिनव 'नव-काव्याचे निर्माते' म्हणून भावी वाङ्मयेतिहासकार त्यांचा उदण्ड बहुमान करतील, यांत शंका नाही.

अभ्र आलें-अभ्र गेलें—

★

अभ्र आलें—अभ्र गेलें ! राहिलीं शेतें बिचारीं !
सारखा आसावुनी हा मोर हाकारी पुकारी !
दृष्टिला लोभावयातें मोहरे नावेक आशा
रंग हर्षाचे खुलोनी टाकिती हे मोहपाशा
झर्झरा आले भरोनी पावसाळी मेघखण्ड
टप्दिशीं आकाशमार्गे ये टपोरा थेंब थंड
येतसे रोमांच आहा, म्लान झालेल्या कपोला
तापलेल्या भूमिचा झाला जरासा ओठ ओला
वाटतें होणार वर्षा ! सन्निधीं साफल्य ठेलें—
तोंच झालें काय हो हें ? अभ्र आलें—अभ्र गेलें !
आर्द्रता ऊर्ध्वान्तरींची पोटची पोटींच आटे
रंगले वाऱ्यावरीं—वाऱ्यावरीं तें स्वप्न फाटे !
नीरदांच्या नीलिमेनें कांहिसा केलाच चाळा
आणि आता हा फिरोनी हो रिता आकाशमाळा
कोरडी तान्हावलेली आर्तता सर्वत्र भासे
सूर्यतापें तप्त झाली भूमि ही टाकी निसासे !
तोयवन्ताने जरी या श्रावणाने शुष्क व्हावें—
रिक्त ऐशा हो, तरी त्या काय वैशाखें करावें ?

—राजकवि काळेले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

श्री. ना. रा. शेंडे, चिटणीस,
यांजकडून.

मंदिरनिधीसाठी ३५ हजार रुपयांचा संकल्प

विदर्भ साहित्य संघाच्या 'मंदिरनिधि' समितीच्या सभा दि. १६, २८ ऑगस्ट आणि दि. २ व ६ सप्टेंबर १९५२ रोजीं भरविण्यांत येऊन, मंदिरासाठीं प्राथमिक गरज म्हणून येत्या विजयादशमीपर्यंत ३५,००० हजार रुपयांचा निधि जमविण्याचा संकल्प जाहीर करण्यांत आला. त्याचप्रमाणे, सध्या मंदिर कोणत्या स्वरूपांत उभारलें जाणें शक्य आहे व त्याची रूपरेषा कशी असावी याबद्दलहि दूरदृष्टीने विचारविनिमय करण्यांत आला.

मंदिरनिधीला सढळ हाताने मदत करा

वि. सा. संघाच्या मंदिरनिधीसाठी मंदिरनिधि समितीचे आमंत्रक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी खालील प्रमाणे विनंतीपत्रक काढलें आहे.

"येत्या विजयादशमीपर्यंत विदर्भ साहित्य मंदिराच्या प्राथमिक खर्चासाठी ३५,००० रुपयांचा निधि जमा करावयाचा आहे. म्हणून नागपूरांतील आणि मध्यप्रदेशांतील सर्व शिक्षणसंस्था, साहित्यसंस्था, नाट्यसंस्था व इतर सांस्कृतिक आणि औद्योगिक संस्था यांना अशी विनंति आहे की त्यांनी आणि वि. सा. सं. च्या सर्व कार्यकर्त्यांनी, सभासदांनी तसेंच मराठी भाषेविषयीं प्रेम आणि कळकळ बाळगणाऱ्या व्यक्तींनी विदर्भ साहित्य मंदिरनिधीला सढळ हाताने मदत करावी आणि हा संकल्प आत्मीयतेने सफल करावा."

देणगीदारांनी आपली देणगी प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे, कोषाध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, नागपूर १, यांच्याकडे तावडतोब पाठवावी.

. विदर्भ साहित्य मंदिराच्या निधीसाठी काढलेलीं तिकिटें वि. सा. संघाच्या कार्यालयांत सायंकाळीं ५॥ ते ८ मिळतील.

श्री. काकासाहेब गाडगीळ यांची वि. सा. संघाला भेट

केंद्रीय महागाई चौकशी समितीचे अध्यक्ष, सुप्रसिद्ध मराठी ग्रंथकार श्री. न. वि. उर्फ काकासाहेब गाडगीळ यांनी शनिवार दि. २३-८-५२ रोजीं सायंकाळीं ६॥ वा. वि. सा. संघाला भेट दिली. संघाध्यक्ष प्रि. डॉ. शं. दा. पेंडसे यांचे अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्या प्रसंगीं श्री. काकासाहेब गाडगीळ यांचें मननीय भाषण झालें. त्यांनी आपल्या भाषणांत, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति आता अनिवार्य आहे, असें सांगून वैदर्भी रीतीप्रमाणे 'लोकशाही रीति' साहित्यांत रूढ करा, असा आदेश दिला.

श्री. दि. के. बेडेकर यांचें भाषण

पुण्याचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. दि. के. बेडेकर यांचें बुधवार दि. २०-८-५२ रोजीं सायंकाळीं ६ वा. 'नवसाहित्यांतील विविध प्रवाह' या विषयावर भाषण झालें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. ना. गो. चाफेकर यांची वि. सा. संघाला भेट

महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष श्री. ना गो. चाफेकर यांनी रविवार दि. ७-९-५२ रोजीं सायंकाळीं ६॥ वा. वि. सा. संघाच्या कार्यालयाला भेट दिली. संघाध्यक्ष प्रि. डॉ. शं. दां. पेंडसे यांचे अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार करण्यांत आला.

—×—

विदर्भ साहित्य संघ. अमरावती शाखा

द्वितीय वार्षिकोत्सव

अमरावती शाखेचा द्वितीय वार्षिकोत्सव ता० ९ व १० आगष्ट रोजी डॉ० जोशी सभागृहांत विविध कार्यक्रमासह साजरा करण्यांत आला. ता० ९ रोजीं सायंकाळीं ७ पासून ‘ शारदा-स्तवन ’ ‘ महाराष्ट्र गीत ’ स्वागत-गीतांनी कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रथमतः शाखाध्यक्ष श्री. नानासाहेब वामणगांवकर, संपादक ‘उदय’ यांनी स्वागतपर भाषण केल्यावर उत्सवाचे अध्यक्ष महाराष्ट्रांतील चोखंदळ समीक्षक श्री. दि. के. बेडेकर, पुणें, त्यांनी अध्यक्षस्थान स्वीकारलें. हारसमर्पणानंतर शाखेचे चिटणीस श्री. नारायणराव तांबी यांनी अहवाल वाचला. आलेल्या संदेशांत महत्वाचे संदेश श्री. मावळणकर, श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. मैथिलीशरण गुप्त, श्री. प्रभाकर माचवे, डॉ० श्रोत्रंडे, म. म. पोतदार, श्री. शं. नवरे, श्री. पु. य. देशपांडे श्री. वु. ना. काटकर आदींचे होते. त्यानंतर अध्यक्ष श्री. दि. के. बेडेकर यांनी भाषण केलें. वंदेमातरम् होऊन पहिल्या दिवशींचा कार्यक्रम संपला.

दुसऱ्या दिवशीं ता० १० ऑगस्ट रोजीं सकाळीं ९॥ वाजतां संघसभासद, कार्यकर्ते व शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी यांची अनौपचारिक सभा होऊन संघासमोरील कार्यासंबंधी चर्चा झाली व कांही निर्णय घेण्यांत आले.

सकाळीं नक्को ११॥ वाजतां भारताचे अर्थमंत्रि श्री. चिंतामणी देशमुख यांचें ४००० वर श्रोतृवर्गासमोर भाषण झालें. ‘ मेघदूताचे ’ भाषांतर कां केलें हें त्यांनी प्रथमतः सांगून साहित्यिकांसमोर असलेल्या कार्यांची चर्चा केली.

दुपारीं ३॥ वाजतां ‘मराठी वाङ्मय लोकप्रवण करण्यासाठी काय केलें पाहिजे’ या विषयावर चर्चा झाली. चर्चेत श्री. प्रभाकर माचवे (दिल्ली) प्रा. व्यवहारे, व सौ. सुधा डोंगरे (अकोला) यांचे निबंध वाचण्यांत आले. त्याशिवाय स्वतः हजर राहून प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. भवानी शंकर पंडित, डॉ. पटवर्धन, प्रा. वनहट्टी, प्रा. पोतदार यांनी भाषणें करून भाग घेतला.

सायंकाळीं ७ वाजतां समारोपाचा कार्यक्रम ‘शशाङ्क-रेखा’ या पुस्तकाच्या श्री. दि. के. बेडेकर यांच्या हस्ते प्रकाशनाने झाला. त्यानंतर सकाळच्या चर्चेपैकी महत्वाचे ५ निर्णय संमेलनासमोर मांडण्यांत आले. नंतर आभार प्रदर्शन व वंदेमातरम् गीत होऊन कार्यक्रम संपला.

रात्रौ १०॥ वाजतां बहुमेळरंजनाचा कार्यक्रम झाला. त्यांत कु. जयपूरकर व कमल फडके यांचें गायन समाजशिक्षणकलापथकाचा अभिनय व ग्रामगीतें व श्री. व्यवहारे यांनी बसविलेलें नृत्य झालें. अशाप्रकारे रात्रौ १२ वाजतां उत्सवाची समाप्ति झाली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ-परीक्षा समिति

परीक्षांचे निकाल

*

विदर्भ साहित्य संघातर्फे ऑगस्ट १९५२ मध्ये घेण्यांत आलेल्या परीक्षांत पुढील विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत—

मराठी प्रवेश

वर्ग १ ला—गुणानुक्रमें—गोपाल शर्मा (नागपूर); प्रल्हाद भगवंत देशपांडे (दारव्हा);

वर्ग २ रा—गोविंद उमाकांत भैद (दारव्हा); सिस्टर जोजीता (अमरावती); पं. हृषीकेश शर्मा (नागपूर); अरविंद केशव पांडे (दारव्हा).

वर्ग ३ रा—दवलतराज रतनचंद मुथा; दिवाकर त्र्यंबक पावळकर; प्रभाकर रामकृष्ण खंडेतोड; कु. जे. जॉन.

मराठी प्रारंभ

वर्ग १ ला--गुणानुक्रमें—राजाराम तिजूजी गजभिये (गोंदिया); मथुरादास शंकरलाल नवगजे (नांदुरा);

वर्ग २ रा—सौ. पुष्पा गंगाधर आठले (नांदुरा); गिरधर वल्लभदास भाटे (नांदुरा); कु. रत्नमाणिका उरकुडा घोडीचोर (गोंदिया); सोमा विष्णू आंबेडारे; सुरेश वसंत तारे; अशोक लक्ष्मणराव खांडेकर; जगदीशकुमार केदारनाथ गुप्ता; चरणदास वनवास नोनारे; प्रभाकर केशवराव पाठक; भीमराव बापू गेडाम; विश्वनाथ चिमणजी मेंढे; कु. सुधा यशवंत टिपणीस.

वर्ग ३ रा—जगदीश रामचरणराव कटकवार; घनश्याम भागवत डोये; तुकाराम श्रावण महारवाडे; बाबूलाल सखाराम तिरपुडे; महादेव सुकाजी शिवनकर; बसंत घनश्याम शिवनकर; शंकर राजारामजी कावडे; शंकर हनूजी भांडारकर; सौ. शांताबाई हरी गोंधळेकर; लक्ष्मीकांत प्रभाकर देशपांडे; किसन निनाजी राठोड; गजानन श्रीरामसा नाफडे; छगनलाल लोणकरण राठी; जगदीश नारायण नारखेडे; जयनारायण बन्सीलाल लड्डा; श्रीनिवास नारायण राणे; सुधाकर पुरुषोत्तम भोंबे; चंद्रकुमार गोपालराव भांडारी; नंदकिशोर गोवर्धन चंद्रकापुरे; हेमराज महादेव कापगते; गुणवंत विनायकराव देशमुख; तुकाराम शंकर नारखडे; मांगीलाल नथमल जैन; कु. कुसुम व्यंकटराव माढरे; कु. कुन्दा विश्वनाथ निसाळ; कु. कुंदा नारायण डबीर; गजानन नानाजी मुकुंदवार; प्रल्हाद सोमा गजभिये; प्रभाकर मोरेश्वर कारखानीस; मधुकर महादेवराव मोघे; मुकुंद वीरेश्वर लिमये; वसंत केशव भिवगडे; शोभेलाल जगनराम राहांगडाले; श्रीराम बापू ठाकरे; सुखराम किसन आग्रटकर.

साहित्य विनीत

वर्ग १ ला (गुणानुक्रमें):—किरीटकुमार हरिभाई देसाई (वरूड); धन्नालाल मोतीलाल भंडारी (नांदुरा); कु. प्रमिला दत्तात्रय महाजन (यवतमाळ);

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चंद्रशेखर गंगाधर चोरघडे (यवतमाळ); कु. लीला गोविंद आचार्य (नांदुरा); कु. शरदिनी भिकाजी धाकस (भंडारा); कृष्णा शंकरराव विभूते (वरुड); कु. प्रभा बाळकृष्ण काणेकर (यवतमाळ).

वर्ग २ राः—कु. उषा अंबादास पतकी; दादाराव मोतीराव अडसोड; प्रल्हाद भीमराव चौधरी; भास्कर आनंदराव राऊत; वसंत गणपतराव कोकाटे; विष्णु लक्ष्मराव मोहरील; शरद महादेवराव काळे; शशिशेखर; गोपाळ देवगावकर; कु. निर्मला माधवराव आगरकर; केशव उमराव निंबाळकर; कु. पुष्पा मुकुंदराव मुल्हेरकर; कु. प्रभा नारायणराव चापट; मारोती बालाजी गेडाम; चंद्रशेखर विश्वेश्वर वेखंडे; मेघश्याम गोपाळराव मस्की; कु. सरोजिनी भरतसिंह गहलोद; कु. कुमुदिनी बाळकृष्ण पाटील; गजानन रामचंद्र सावळापूरकर; कु. मालती पांडुरंग अलोणी; राम बालकृष्ण कोलारकर; वामन गणपतराव चौधरी; कु. सुलोचना दत्तात्रय दिवेकर; ओंकार रामकृष्णसा ढवळे; कु. मालिक विनायक खानापूरकर; यशवंत रामकृष्ण इंगळे; मधुकर पांडुरंग क्षीरसागर ; ऋषी हरी सोरते; अभिमान मारुतराव रुद्राक्षवार; कु. कमल बालकृष्ण देशपांडे; कु. कमल विनायक पावगी; कु. कालिंदी कृष्णराव देशपांडे; गजानन माधवराव हेमके; कु. नलिनी शामराव तांबेकर; नामदेव रामचंद्र मुडे; प्रभाकर आकाजी चोरे; प्रभाकर नानाजी कुंदारपवार; प्रभाकर सोमप्पा मोगलेवार; भास्कर हरिभाऊ भावे; वसंत लछमैय्या पामपट्टीवार; वसंत शंकरराव गुलवाडे; विमल आनंद भारती; शरच्चंद्र कवडूजी अकोलकर; कु. शालिनी नानाजी धोटे; कु. सुशीला आत्माराम चांदोरे; कु. सिंधु रामराव वनसोड; सुधाकर सोमप्पाजी मोगलेवार; कु. सुमती विष्णुपंत पेशवे; ज्ञानबा गोविंदराव गुलवाडे; कृष्णनाथ गणपतराव धोटे; गंगाधर बकारामजी पोतदार; गुलाब कृष्णाजी कनेरे; नारायण रिणसाजी गुल्हाने; रामराव लक्ष्मणराव चौधरी; गंगाराम नागोजी कोकोडे; डोमा संभुजी पुस्तोडे; रामकृष्ण आकोजी काशीवार; रामजी सखारामजी फाये; रामदास लक्ष्मणराव मोकळकर; कृष्णराव रामराव लोखंडे; रामचंद्र गौरीशंकर उपाध्ये; रामदास कृष्णराव माहुलीकर; भालेराव वसंत अन्नाजी; कु. विमल केशवराव देशमुख; कु. पुष्पा खंडेराव रांगोळे; कु. सुमन नारायण तत्त्ववादी; मीनानाथ रघुनाथ फासे.

वर्ग ३ राः—गोपीकिसन परशराम साबू ; गोवर्धन गोपालदासजी चांडक; जुगलकिशोर टिरालाल बजाज; पद्माकर हरिभाऊ कठाळे; भाऊराव शंकरराव औतकर भास्कर शंकरराव शिरास; मधुकुमार शंकरराव वाटाणे; मधुसुदन विनायकराव धारव, सदाशिव किसनराव लहाने; बलराज मारोतराव रामटेके; कु. शशिकला मकरंदराव देशपांडे; गुणवंत पांडूसा जिरापुरे; मनोहर लक्ष्मणराव जोगळेकर; शरद केशवराव पांडे; केशव खुशालराव वनकर; निळकंठ माधवराव येरपुडे; विठ्ठलराव नागोरावजी आखरे; वामन माणिकरावजी निकाजू; कु. सुधा माधवराव केकतपुरे; मधुकर उद्धवराव दुशेट्टीवार; मोहनसिंह मेलाराम मखीजा; रामचंद्र लालूजी पेटकर, वामन रामचंद्र भट्टलवार; कु. सुमन सखाराम गोसावी; कु. उषा अनंत पंडितराव; कु. कुसुम मोहनलाल गुप्ता; भास्कर भय्याजी दवंडे; रत्नाकर बाबूराव पेंढरकर; रसिकलाल मोहनलाल अधिया; कु. मंदा विनायकराव काळीकर; प्रभाकर पुरुषोत्तमराव देशपांडे; प्रभाकर मारोतराव दिवे; मधुकर हरिभाऊ साठे; नीळकंठ सोमाजी ढुंपावार; गणेशदास गोपिकिसन राठी; गिरीशकुमार सीतारामपंत फडतरे;

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नारायणदास नरसिंगदास लड्ढा; पुरुषोत्तम शंकरराव देशपांडे; कु. सिंधु माधवराव शुक्ल; सुरेश दत्तात्रय कुळकर्णी; केशव कृष्णराव जोशी; पद्माकर माधवराव जोशी; वामन वासुदेव जोशी; रामदास श्रावण पाटील; कृष्णा बाळीराम जयसिंगपुरे; मधुसुदन केशवराव पटाईत; प्रभावती केशवराव खंडेतोड; बाळकृष्ण भोपीअप्पा उरगुंडे; मधुकर नारायण येरावार; कु. रत्नप्रभा दिनकर दामले; रामचंद्र शिवराम पाटील; कु. रेवती निळकंठ चौधरी; कु. शकुंतला माधवराव पेशवे; कु. शशिकला भगवंतराव पाठक; कु. सिंधु दत्तात्रय मुल्हेरकर; कु. सिंधु रामराव बनसोड; हरीनारायणजी रोकडे; दिनेश नारायणराव वानखेडे; वामन रामजी रडके; हरीराम नामदेवराव कुटे; किसन जैरामजी मेंढे; सांबा दामाजी मेश्राम; कु. अंबिका नारायणरराव देहनकर; पुरुषोत्तम गोपाळराव राऊत; कु. मिरा रामचंद्रराव सोनवणे; रंगराव आनंदराव तायवाडे; कु. सुकन्या वामनराव दापूरकर; कु. सुशीला मोरेश्वर देशपांडे; श्री. लक्ष्मीबाई रामराव धर्माधिकारी; काशीराव केशवराव देशमुख; जानराव लक्ष्मणराव मानकर; पुंडलीकराव राजाराम रेचें; पुरुषोत्तम विठोबा लांडे; रामकृष्ण हरिभाऊ टोहरे; रामभाऊ सुदामा धोंडेकर; लक्ष्मण बळीराम धोत्रे; वामन परशराम ढोरे; पुंडलीक राघोबा गायकवाड; देवराव लक्ष्मणराव गावंडे; सुंदरलाल किसनलाल शिक्केवाल.

साहित्य परिचित

वर्ग २ रा (गुणानुक्रमें) :—कु. निर्मल गणेश ओगले; (भा. भा. मं.); कु. शरयू शामराव कोठारे (भा. भा. मं.); मोरेश्वर वामनराव अभ्यंकर (भा. भा. मं.); कु. प्रमिला दत्तात्रय दिवेकर (भा. भा. मं.); यशवंतराव केशवराव सातपुते (भा. भा. मं.); गोविंद पिसाराम कमाने; भास्कर कालिदासपंत बंगाले, कु कालिंदी महादेव गोखले; कु. विमल कृष्णराव रहातेकर; सौ. शोभना श्रीपाद घाणेकर.

वर्ग ३ राः—सौ. ताराबाई रामकृष्ण हिरडे; कु. पूर्णाबाई एम् बोरकर; बलवंत गुणवंतराव देशमुख; श्रीरामचंद्र कृष्णराव गव्हाणकर; कु. उषा नारायण हरदास; सौ. नलिनीबाई देवईकर; मधुकर पांडुरंग देशमुख; कु. मालती वामनराव अभ्यंकर; कु. मंदाकिनी विनायक भावे; सौ. राधाबाई श्रीधर हरदास; कु. विमल विनायक जोगवार; शरद महादेव देशपांडे; श्रीकांत लक्ष्मणराव गिरपुंजे; सौ. शांताबाई सदाशिवराव दंडिगे; कु. सिंधू बाबुराव वेदक; कु. सिंधू मुरलीधरराव कांडगे; कु. सुमन केशवराव सोनटक्के; एकनाथ चंदूजी रंगारी; त्रिंबक हरिभाऊ पांडे; विठ्ठल रामाजी बोबडे; मुकुंद आनंद झिंजर्डे; विनायक कृष्णराव जोशी; गंगाधर भिकाजी रामटेके; कु, दुर्गा विठ्ठलराव चरेगावकर; लक्ष्मीकांत गोविंद देव.

साहित्य स्नातक

वर्ग १ ला (गुणानुक्रमें):—कु. पद्मा गणपतराव बेटावदकर (भंडारा.)

वर्ग २ राः—विनायकराव गोविंदराव दुर्गे (भा. भा. मं.); तुळशीराम नागेश काटकर (चांदा.); कु. मंदाकिनी विनायक देशकर (भा. भा. मं.); कु. लीला विश्वनाथ हरणखेडकर (अमरावती).

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर्ग ३ रा:—लक्ष्मण सीताराम डोंगे; कु. अनसूया कृष्णराव धर्माधिकारी; रजतकुमार अंबादासजी गव्हाणकरी; कु. शशिकला शंकरराव खामगावकर; सौ. लक्ष्मीबाई चिंतामण गोखले; भार्गव पांडुरंग भागवतकार.

साहित्य पारंगत

वर्ग २ रा (गुणानुक्रमें):—माणिक केशवराव बैतुले (भा. भा. मं.); हरिहर गोविंदराव येगावकर (भा. भा. मं.); भाऊराव गणपतराव पाटील (नांदुरा); कु. कमलिनी बलवंत टोंगू (भा. भा. मं.).

पारितोषिकें

१ साहित्यविनीत या परीक्षेंत सर्वांत अधिक गुण मिळविल्याबद्दल किरीटकुमार हरिभाई देसाई (वरुड केंद्र) ह्यांना प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक देण्यांत आलें आहे.

२ साहित्यविनीत या परीक्षेंत हिंदी मातृभाषा असलेल्या उत्तीर्ण उमेदवारांत सर्वांत अधिक गुण मिळविल्याबद्दल कु. सरोजिनी भरतसिंह गहलोद (भंडारा केंद्र) यांना तिरोडा येथील एक साहित्यप्रेमी श्री. ब्रजकिशोर मिश्रा ह्यांच्याकडून ११ रुपयांचें पारितोषिक देण्यांत आलेलें आहे.

उषा कोलते
कार्यवाह, परीक्षासमिति

ता. १६-९-१९५२

अभिनंदन

★

येत्या ऑक्टोबरमध्ये अमळनेर येथे भरणाऱ्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्राचे नामवंत भाषाशास्त्रज्ञ, संशोधक व प्राचार्य कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी यांची निवड झालेली आहे. त्यांच्या सारख्या अधिकारी आणि अनुभवी भाषातज्ञाला निवडून देण्यांत संमेलनाने फारच औचित्य दाखविलें आहे. त्यांच्या निवडीबद्दल विदर्भ साहित्य संघातर्फे आम्ही त्यांचें मन:पूर्वक अभिनंदन करतों.

—संपादक, 'युगवाणी'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्यांकडून लायब्रऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

मासिक, सप्टेंबर १९५२

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीनें स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीनें उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमानें सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपानें अधिक धडाडीनें करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेनें तनमनधनानें मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटानें चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येनें वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

मुद्रक : प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ